सहल थंड प्रदेशाची
। थर्मल । स्वेटर्स । जर्किन
। ग्लोज । सॉक्स । कॅप्स्
बरंच काही एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड ,अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

FREE
SUGAR 1 KG
ON BILL OF RS. 1299*
11 MAY TO 31 MAY 2024
बारदाना फुड्स्
— EXCLUSIVE STORE —
कोहिनूर प्लाझा,
पत्रकार चौक,
लोकमत भवन शेजारी, सावेडी रोड, अ.नगर
WhatsApp / Call on: 9403738822
रविवार बंद

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, सोमवार दि. २०.०५.२०२४ | अंक नं. ०६७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

खरेदीवर आकर्षक गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

# नगरच्या वाडियापार्क जलतरण तलावात होत आहे आर्थिक लूट

## पोहणाऱ्यांकडून ५० ऐवजी १०० रुपये घेतले जात असल्याच्या तक्रारी, व्हिडीओ 'व्हायरल'




नगर – नगरच्या वाडिया पार्क जिल्हा क्रीडा संकुल परिसरात असलेल्या जलतरण तलावात पोहायला येणाऱ्यांची या तलावाच्या देखभाल दुरुस्तीचा ठेका दिलेल्या खाजगी संस्थेकडून मोठी आर्थिक लूट केली जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. या संदर्भात एक व्हिडिओ शहरात व्हायरल होत आहे.

सध्या तापमानाचा पारा वाढलेला असल्याने उन्हामुळे होणारी अंगाची काहिली आणि घामाच्या धारा यापासून 'रिलिफ' मिळावा, वाडियापार्क जलतरण तलावात पोहण्यासाठी येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. जिल्हा क्रीडा संकुल समितीने या तलावाच्या देखभालीचा आणि तलाव चालविण्यासाठीचा ठेका कुलकर्णीज् स्वीम ॲकॅडमी या संस्थेला दिलेला आहे. ठेका देताना झालेल्या करारानुसार एका व्यक्तीला ४५ मिनिटे पोहण्यासाठीचे शुल्क ५० रुपये ठरवून दिलेले असतानाही या संस्थेकडून सर्रासपणे प्रत्येकाकडून १०० रुपये शुल्क घेतले जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. याबाबतचा व्हिडीओ शहरात सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे. काही जणांनी तेथील कर्मचाऱ्यांकडे याबाबत विचारणा केली असता प्रत्येकाला ४५ मिनिटाचा वेळ असतो पण एकदा आत पोहायला गेलेले लवकर बाहेर येत नाहीत, त्यामुळे आम्ही डबल चार्ज घेत असल्याचे न पटणारे उत्तर त्या कर्मचाऱ्यांनी दिले आहे.

या आर्थिक लुटीची सखोल चौकशी होण्याची गरज आहे. आतापर्यंत या ठिकाणी ज्यांची ज्यांची आर्थिक लूट झाली, ते सर्वजण नगरचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष असलेले सिद्धाराम सालीमठ यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रार करणार आहेत.

### जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची गरज

नगरच्या वाडियापार्क परिसरात असलेला हा जलतरण तलाव गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. मात्र वेगवेगळ्या कारणांनी हा जलतरण तलाव सातत्याने चर्चेत येत असतो. याठिकाणी जे व्यवस्थापन आहे, ते खासगी संस्थेचे आहे. या खाजगी संस्थेकडून नगरकरांची आर्थिक लूट थांबविण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष असलेले सिद्धाराम सालीमठ यांनी यामध्ये लक्ष घालण्याची गरज आहे.

# विजेचा शॉक बसून बालकाचा दुर्दैवी मृत्यू

## एमआयडीसीतील बालगृहात घडली घटना; नातेवाईक संतप्त


साईराज भांबरे

नगर – विजेचा शॉक बसून ९ वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना एमआयडीसी परिसरात असलेल्या आठरे पाटील बालगृहात सोमवारी (दि.२०) सकाळी घडली. साईराज गणेश भांबरे (रा. आठरे पाटील बालगृह, एमआयडीसी, मूळ रा. हातगाव ता. शेवगाव) असे या मयत बालकाचे नाव आहे.

मयत साईराज याचे वडिलांचे निधन झालेले असल्याने त्याला त्याचे मामा शिवराज भीमराज देडगे व इतर नातेवाईकांनी एमआयडीसी परिसरात असलेल्या आठरे पाटील बालगृहात ठेवलेले होते. त्याने दुसरीची परीक्षा दिली होती व तो इयत्ता ३ री मध्ये गेलेला होता. सोमवारी सकाळी तो बालगृहात असताना त्याला विजेचा शॉक बसला. ही माहिती तेथील कर्मचाऱ्यांनी त्याचे मामा शिवराज देडगे यांना कळविली त्यांनी तातडीने बालगृहात धाव घेत साईराज याला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात सकाळी १०.२० च्या सुमारास दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यास उपचारापूर्वीच मयत घोषित केले. दुपारी त्याच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दरम्यान या घटनेनंतर मयत साईराजचे नातेवाईक संतप्त झाले. बालगृहाच्या व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे ही घटना घडल्याचा आरोप करत व्यवस्थापनावर गुन्हा दाखल करण्याची मागणी मयत मुलाच्या नातेवाईकांनी केली आहे. जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मयत साईराज याचा मृतदेह एमआयडीसी पोलीस ठाण्यासमोर ठेवणार असल्याचे मयत साईराजचे मामा शिवराज देडगे यांनी सांगितले.


शहरातील वीजपुरवठा सुरळित करा अन्यथा आंदोलन करण्याचे निवेदन गॅसबत्ती व मेणबत्ती पेटवून अधीक्षक अभियंता यांना देताना राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर. समवेत पदाधिकारी.

# शहरातील खंडित वीजपुरवठ्याच्या निषेधार्थ गॅस बत्ती व मेणबत्ती पेटवून केले 'आंदोलन'

## वीजपुरवठा सुरळीत करा अन्यथा तीव्र आंदोलन करणार : राष्ट्रवादी काँग्रेसचे संपत बारस्कर

नगर – अनेक दिवसांपासून शहर व उपनगरामध्ये ग्राहकांना पुर्वकल्पना न देता वारंवार बीज खंडीत केली जात आहे. गेल्या १५ दिवसात वीज खंडीत होण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे. थोड्या प्रमाणात वादळी वारे सुटले की लगेच वीज खंडीत होते. तसेच उन्हाळ्याचे दिवस सुरु असून उष्णतेची तीव्रता वाढली असून, लाईट गुल होण्याचे प्रमाण वाढल्याने नागरिक हैराण झाले आहे. त्याचप्रमाणे पुढील महिन्यात पावसाळा सुरू होत असून, मान्सूनपूर्व तयारी कुठेही दिसून येत नाही. तसेच विद्युत तारांवरील झाडांच्या फांद्या तोडून उचलून घेऊन जाव्यात आणि शहरातील विद्युत कार्यालयात नागरिकांचे आलेले फोने उचलावेत तसेच फोन न उचलणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. विद्युत विभागाच्या वतीने नागरिकांना वेठीस धरण्याचे काम केले जात आहे त्याचा निषेध म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अधिक्षक अभियंता कार्यालयात लाईट बंद करून गॅस बत्ती व मेणबत्ती पेटवून आंदोलन करण्यात आले. शहरातील वीज पुरवठा सुरळीत करा अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी दिला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अधिक्षक अभियंता कार्यालयात लाईट बंद करून गॅस बत्ती व मेणबत्ती पेटवून आंदोलन करण्यात आले. यावेळी संपत बारस्कर, प्रा.माणिकराव विधाते, प्रकाश भागानगरे, अभिजित खोसे, जॉय लोखंडे, सुरेश बनसोडे, साहेबान जहागीरदार, साधना बोरुडे, शैला गिरे, रेणुका पुंड, रूपाली गायकवाड, किरण कटारिया, तुकाराम कोतकर, सोनू घेमुड, माऊली जाधव, मंगेश खताळ, केतन क्षिरसागर उपस्थित होते.

यावेळी विद्युत विभागाच्या वतीने लेखी आश्वासन देवून सांगितले कि, पुरवठा सुरळीत राहील. याकरीता सर्वतोपरी योग्य ते नियोजन व उपयोजना करण्यात येतील. तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी व तक्रार निवारण केंद्रातील फोन वेळेत घेतले जातील व ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण करण्याबाबत संबंधितांना सूचना करण्यात येतील व फोन न उचलल्यास संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच अहिल्यानगर शहर व उपनगरातील संबंधित उपविभाग कार्यालय व कक्ष कार्यालय येथील तक्रार निवारण केंद्रातील दुरध्वनी क्रमांक देण्यात येतील.

यावेळी सावेडी व नालेगाव येथील कक्ष कार्यालयातील फोन न उचलणाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल व सर्व लाईनवरील झाडे तोडण्याचे काम करण्यात येऊन ते उचलण्यात येतील. तसेच उघड्या डीपीचे दरवाजे आठ दिवसाचे आत बंद करण्यात येतील, असे आश्वासन यावेळी देण्यात आले.

# विजपुरवठा सुरळीत करा अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोलन

## शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या वतीने वीजवितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता यांना निवेदन


वारंवार होणारा खंडीत वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा अन्यथा शिवसेना (ठाकरे गट) च्यावतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता यांना निवेदनाद्वारे देण्यात आला.

नगर – अहमदनगर शहरातील वारंवार होणारा खंडीत वीज पुरवठा सुरळीत करण्यात यावा अन्यथा शिवसेना (ठाकरे गट) च्यावतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता यांना देण्यात आला.

याप्रसंगी याप्रसंगी माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी विरोधीपक्ष नेते संजय शेंडगे, युवा सेना राज्य सहसचिव विक्रम राठोड, दत्ता कावरे, सचिन शिंदे, शाम नळकांडे, संतोष गेनप्पा, अशोक दहिफळे, संदिप दातरंगे, जेम्स आल्हाट, गौरव ढोणे, जालिंदर वाघ, गिरिधर हांडे, संजय आव्हाड, अरुण झेंडे, दिनेश लाड, मुन्ना भिंगारदिवे आदिंसह शिवसैनिक उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, गेल्या एक-दोन महिन्यांपासून नगर शहरात अचानक वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहेत. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने विजेअभावी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहेत. वीजेची झालेली दरवाढ आणि वेळेवरही लाईट बील भरुनही नागरिकांना व व्यापाऱ्यांना योग्य पद्धतीने सेवा मिळत नाही. परिणामी इन्व्हर्टर, जनरेटचा आधार घ्यावा लागत आहे, त्यामुळे नाहक खर्च वाढत आहे. वीज प्रवाह अचानक कमी-जास्त होत असल्याने इलेक्ट्रीक, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे बिघडत आहेत.

थोडे वादळ व पावसाचे वातावरण तयार झाले की लाईट चार-चार तास तर कधी-कधी रात्रभर येत नाही. त्यामुळे शहरातील नागरिकांना रात्रभर जागरण करावे लागते आहे. वीज वितरण कार्यालयात फोन लावला तरी फोन उचलत नाही आणि उचललाच तर व्यवस्थित उत्तरे देत नाही. तरी ही वीज वितरण व्यवस्था तातडीने सुरळीत न झाल्यास शिवसेनेच्यावतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे दिला आहे.

याप्रसंगी भगवान फुलसौंदर म्हणाले, गेल्या काही दिवसांपासून विज वितरण कंपनीकडून भारनियमन जाहीर झालेले नाही, तरीही दिवसभरातून अनेकवेळा लाईट घालविली जाते. त्यामुळे नागरिक, व्यापारी यांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. लाईट नसल्याने पाण्याच्या टाक्या भरणे अवघड होते. अचानक कमी-जास्त विज पुरवठा होत असल्याने घरगुती उपकरणे बिघडण्याची प्रमाणही वाढले आहे. सध्याचे वादळ-वारा, पावसाचे दिवस असल्याने याचे नियोजन करणे गरजे आहे, परंतु विज वितरण कंपनीचे लक्ष नसल्याने नागरिकांना नाहक त्रास होत आहे. यात तातडीने सुधारणा न झाल्यास आंदोलनाशिवाय पर्याय नाही, असे फुलसौंदर म्हणाले.

# महाराष्ट्र बोर्डाचा १२ वीचा निकाल २१ मे रोजी दुपारी जाहीर होणार

पुणे – महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा म्हणजे बारावीचा निकाल २१ मे रोजी जाहीर करण्यात येणार आहे. महाराष्ट्र बोर्डाकडून नुकताच याबद्दलची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना mahresult.nic.in, mahahsscboard.in या वेबसाईटवर निकाल पाहता येणार आहे.

शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी महिन्यात परीक्षा घेण्यात आली होती. आता २१ मे रोजी दुपारी १ वाजता निकाल जाहीर होणार आहे. विद्यार्थ्यांना दुपारी १ वाजल्यापासून अधिकृत वेबसाईटवर हा निकाल पाहता येणार आहे. हा निकाल पाहिल्यानंतर लगेचच निकालाची प्रिंटही घेता येणार आहे.

स्मृतीगंध
तव आदर्शांचा... तव संस्कारांचा..



स्व. मदनलालजी कचरदासजी छाजेड
स्व. दि. २१/५/२००५
आपल्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली
छाजेड परिवार
पुणे - अहमदनगर

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
सोनी टाईल्स अँड मार्बल इंडस्ट्रिज

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## मेळघाटावरील मोहर - डॉ. रविंद्र व डॉ. स्मिता कोल्हे

एका आगळ्या वेगळ्या समाज परिवर्तनाच्या प्रयोगाची डॉ. कोल्हे दाम्पत्यांची ही कहाणी लिहिली आहे मृणालिनी चितळे यांनी.

मेळघाट म्हणजे सातपुडा पर्वतातील घनदाट अरण्यप्रदेश. येथील तापी, खापरा, सिपना या नद्यांच्या संगमावरचं गाव बैरागड. दारिद्र्यानं पोखरलेलं, आजारानं ग्रासलेलं, अज्ञानानं पिचलेलं हे छोटं गाव.

१९९० च्या आसपास हे डॉक्टर दाम्पत्य येथे आले. दवाखान्यात औषधोपचार व अवघड बाळंतपण करायचे पण मनात हेतू मनाच्या, गावाच्या सर्वांगिण विकासाचा. त्यांनी संस्था उभारली नाही. प्रबोधनासाठी वेगळ्या वाटा शोधल्या. कधी शिक्षणातून प्रबोधन, कधी उत्सवातून तर कधी कोर्ट कचेरीच्या हिसक्यातून प्रबोधन. ते शेतीच्या प्रयोगात शिरले. धर्मांतराच्या प्रश्नाला भिडले.

वाचनीय मननीय
प्रेरणादायी
अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



विदर्भातील अनेक वर्षे मागासलेल्या व शहरीकरणाचा मागमूसही नसलेल्या अत्यंत दयनीय अवस्थेतल्या लोकांना जीवन सुकर करून देण्यात बाबा आमटे, प्रकाश आमटे व परिवारानंतर डॉ. रविंद्र व डॉ. स्मिता कोल्हे यांनी मोलाचे योगदान दिले आहे. प्रकाशाच्या या वाटा नेहमीच प्रेरणादायी राहतील.

## ट्रॅक्टर उलटल्याने सुनील मडके यांचा मृत्यू



नगर - लोणी व्यंकनाथ (ता.श्रीगोंदा) येथील सुनील मडके पाटील (वय ४५) यांचे ट्रॅक्टर उलटल्याने झालेल्या अपघातात निधन झाले.

ते श्रीगोंदा तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक होते. ते काही काळ उपसरपंच होते. पाऊस येत असल्याने कांदा झाकण्यासाठी शेतात चालले असता ट्रॅक्टरला ब्रेक लावित असताना ट्रॅक्टर एका बाजूला कलटल्याने सुनील मडके यांचा खाली उडी मारण्याचा प्रयत्नात ट्रॅक्टरखाली सापडून जागीच मृत्यू झाला.

त्यांच्या पश्चात वडिल, पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे.

## पंढरीनाथ येवले यांचे हृदयविकाराने निधन



नगर - केडगाव येथील रहिवासी पंढरीनाथ निवृत्तीराव येवले (वय ६७) यांचे २० मे रोजी पहाटे ५ वा. हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर केडगावच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, प्रवीण व प्रशांत ही २ मुले, मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

### एल.आय.सी.चे एजंट
## नरेंद्र मुनोत यांचे हृदयविकाराने निधन



नगर - येथील खिस्तगल्लीतील रहिवासी नरेंद्र उर्फ बाळू कनकमल मुनोत (वय ६२) यांचे १९ मे रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

नरेंद्र मुनोत हे एल.आय.सी. एजंट होते. त्यांच्या पश्चात पत्नी, १ भाऊ, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.

## कांतीलाल लोढा यांचे अल्पशा आजाराने निधन



नाशिक - नाशिक येथील कांतीलाल लालचंद लोढा (आडगाववाला, गुळवाला, वय ७५, महावीर बंगला, ओम नगर, हिरावाडी रोड, नाशिक) यांचे १८ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर पंचवटी नाशिक अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले (पंकज, मनोज), १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शांतीलाल, मोहनलाल, दीपक, अभय यांचे ते बंधू तर मुंबई येथील उदयमल, सुरेश, पारस यांचे ते मेव्हणे तसेच राजन, संजय, हरीष, महेश, पवन, आनंद याचे ते काका होत तर नगर येथील सौ. वैशाली मनोज शेटीया यांचे वडील होत.

## बाजीराव चोभे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - नगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद येथील बाजीराव बाबाजी चोभे (वय ८७) यांचे १९ मे रोजी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन बहिणी, दोन मुले, सुना, नातवंडे, पंतवंडे असा मोठा परिवार आहे.

स्व. बाजीराव चोभे हे प्रगतशील शेतकरी व दूध व्यायासायिक होते. त्यांचा अंत्यविधी घराजवळ नदीकाठी करण्यात आला.

## लता गिरमे यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन



श्रीरामपूर - येथील लता बाबुराव गिरमे (वय ७४) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, दिर, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मेनरोड येथील अजय चायनीज, अजय वूड कटर व अजय इलेक्ट्रिकलचे मालक नितीन गिरमे, संतोष गिरमे व अजय गिरमे यांच्या मातोश्री, शंकरराव गिरमे व उद्धवराव गिरमे यांच्या भावजई, सागर व चेतन गिरमे यांच्या चुलती होत.

## रामवृक्ष रजपूत यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील बस स्टॅन्ड समोरील लोकसेवा हॉटेलचे मालक व अशोकनगर फाटा येथील शारदा ऑटोमोबाईल्सचे मालक रामवृक्ष रामबल्लीसिंह रजपूत (वय ८१) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक भाऊ, चार मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

अरविंद रजपूत व रविंद्र रजपूत यांचे वडील, प्रेमनारायण रजपूत यांचे थोरले बंधू, मनोज, संजय व संदिप (बबलू) रजपूत यांचे चुलते होत.

## मीटरमध्ये छेडछाड करून दीड लाखांची वीजचोरी

नगर - वीज मीटरमध्ये छेडछाड करून पाणी शुध्दीकरण प्लँटला वीज वापरत असल्याचा प्रकार नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथे उघडकीस आला. महावितरणच्या शेंडी विभागाचे कनिष्ठ अभियंता नवनाथ कारभारी बडे (वय ४९, रा. तपोवन रस्ता, सावेडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शनिवारी एमआयडीसी पोलीस ठाण्यात वीज चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवनाथ बडे यांच्या पथकाने १२ मे २०२४ रोजी दुपारी अडीच वाजता रामदास भानुदास झिने (रा. पिंपळगाव माळवी) यांच्या पाणी शुध्दीकरण प्लॅन्टच्या वीज मिटरची तपासणी केली. तपासणीदरम्यान त्यांना मिटरमध्ये छेडछाड करून वीज वापरली जात असल्याचे निदर्शनास आले. झिने याने एकुण १ लाख ४८ हजार २८३ रूपयाची वीज चोरी केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस अंमलदार मिसाळ अधिक तपास करत आहेत.





नगर-कल्याण रोडवरील गणेशनगर येथे मुख्य रस्त्यावर सिमेंटच्या कंटेनरने धडक दिल्याने विजेच्या तारा तुटल्याने या भागातील पथदिवे व घरातील सर्व वीज पुरवठा खंडीत झाला. दुसऱ्या छायाचित्रात कंटेनर दिसत आहे.

# कंटेनर विजेच्या खांबाला धडकला पथदिवे व घरातील सर्व लाईट बंद

### रात्रभर गणेशनगर परिसरातील नागरिक अंधारात

नगर - कल्याण रोड येथील गणेशनगर येथे मुख्य रस्त्यावर रात्री साडेनऊ वाजता सिमेंटचा कंटेनर क्र. चह-१२RN -१२१३ हा विजेच्या खांबाला धडकला यामुळे विजेच्या अनेक तारा तुटल्या विजेचा खांब कोसळला. गणेशनगरचा मुख्य रस्तावर सिमेंटच्या कंटेनर चा अपघात झाल्याने विजेचा खांब येणाऱ्या जाणाऱ्या रस्त्यावरच विजेचा खांब कोसळल्याने तसेच विजेच्या तारा रस्त्यावर तुटून पडल्या सुदैवाने यावेळी नागरिक रस्त्यावर नसल्याने मोठा अनर्थ टाळला. जीवितहानी झाली नाही.

गणेशनगर भागातील पथदिवे व घरातील सर्व लाईट बंद झाले. गणेशनगर रात्रभर अंधारात होते. यावेळी नागरिक उपस्थित होते. मानवी वसाहतीत येणारे मोठे कंटेनर बंद व्हावेत. अशी नागरिकांची मागणी आहे.

कॉलनीच्या मुख्य रस्त्यावर अनेक नागरिकांची ये जा असते. तसेच विजेचे खांब व लाईटच्या तारा उंच असताना देखील मोठे कंटेनर आल्याने चालकाला अंदाज येत नाही. अनेक वेळा विजेचे खांब व तारा तुटतात. कॉलनीतून मोठे कंटेनर येऊ नये, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कर्ज मंजुर केले नाही म्हणून बँकेच्या प्रतिनिधीला फोनवरून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी

नगर - दुचाकी घेण्यासाठी कर्ज मंजुर केले नाही म्हणून बँकेच्या प्रतिनिधीला फोनवरून शिवीगाळ करत जिवे ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. जमीर हलीम राजे (रा. समीरनगर, वाबळे कॉलनी, फकीरवाडा) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. अमोल झुंबर कचरे (वय ३३, रा. पोलीस मुख्यालय, नगर) यांनी तक्रार दिली आहे.

फिर्यादी अमोल कचरे हे एचडीएफसी बँकेच्या लालटाकी, नगर येथील शाखेत लोन विभागात लोन मंजुरी संदर्भात काम पाहतात. जमीर हलीम राजे याने दुचाकी लोन मंजुरीसाठी लालटाकी शाखेत फाईल दाखल केली होती. दरम्यान त्याची फाईल बँकेकडून नामंजूर करण्यात आली होती. त्याने नंतर दुसऱ्या बँकेकडून लोन मंजुर करून घेतले. दरम्यान लोन मंजुर केले नाही म्हणून राग आलेल्या जमीर याने तक्रारदार अमोल यांना फोन करून शिवीगाळ केले. जीवे ठार मारण्याची धमकी दिली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक सचिन रणशेवरे अधिक तपास करत आहेत.

## जैन गुजराथी समाजाचा १६ जूनला पुणे येथे वधु-वर परिचय मेळावा

नगर - जैन श्वेतांबर मूर्तिपूजक गुजराथी समाजासाठी उच्चशिक्षीत वधू-वर परिचय मेळावा आणि पुस्तक प्रकाशन सोहळा १६ जून रोजी पुणे येथील नंदु भवन ए.सी. हॉल, कोंढवा येथे होणार आहे.

२५ मे रजिस्ट्रेशनची शेवटची तारीख आहे. लवकरात लवकर रजिस्ट्रेशन करावे असे आवाहन नगरचे स्थानिक प्रतिनिधी भरत शहा यांनी केले आहे.

रजिस्ट्रेशन ऑनलाईन करता येईल. https://Jainvadhuvarsansthapune.com/ragistration/

अधिक माहितीसाठी भरत शहा (C/o कांतीलाल साकळचंद, गंज बाजार, अहमदनगर मो.नं.९४२३०४५९२९, पुणे अध्यक्ष - दिलीपभाई मेहता मो.नं.९८२२०७९०१५ यांच्याशी संपर्क साधावा.

## हॉस्पिटल समोरून दुचाकीची चोरी

नगर - सावेडी उपनगरातील नोबेल हॉस्पिटल च्या समोरील रस्त्याच्या कडेला लावलेली होंडा कंपनीची सीडी डिलक्स मोटारसायकल (क्रं.एम.एच.१२ ई के २८०५) अज्ञात चोरट्याने शनिवारी (दि.१८) रात्री ९ ते १०.४५ या दरम्यान चोरून नेली आहे.

याबाबत सचिन खेमराज गायकवाड (रा. चेतना कॉलनी, नवनागापूर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.दं.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# माहिती अधिकार कायदा अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र प्राथ. शिक्षण परिषदेचा भोंगळ कारभार

### अपिलकर्त्यास वेठीस धरुन मानसिक खच्चीकरण, विशेष शिक्षक पदावर वारंवार अन्याय; मात्र शासनाचे पूर्ण दुर्लक्ष

नगर - केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा अभियान समावेशित शिक्षण अंतर्गत कार्यरत प्राथमिक कंत्राटी विशेष शिक्षकांच्या वेतनामध्ये सहा वर्षापासून वाढ झालेली नाही. अल्प मानधनात कुठलीही सुविधा नसताना विशेष शिक्षक पदावर वारंवार अन्याय झाला असून, शासनाचे याकडे पूर्ण दुर्लक्ष झाले असल्याचा आरोप उमेश शिंदे यांनी केला आहे. या प्रश्नाबाबत माहिती अधिकारात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्याकडे माहिती मागवली असता, काही अर्जाची माहिती दिशाभूल करणारी उगाच व्यापक देण्यात आली, तर काही अर्जाची माहिती आजही देण्यात आलेली नसून, माहिती अधिकार कायदा अंमलबजावणी बाबत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचा भोंगळ कारभार उघड झाला असल्याचे श्री. शिंदे यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्याकडे प्रथम अपील केले असताना ४५ दिवसात प्रतिसाद देणे अपेक्षित होते. मात्र ९० दिवस उलटून गेल्यानंतर दिरांगाईने का होईना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे उपसंचालक संजय डोर्लीकर यांनी असंदर्भिय अर्जाचा संदर्भ ४ दिवस आधी प्रथम अपील सुनावणीस हजर राहण्यास सांगण्यात आले. परंतु नियमानुसार ७ दिवस आधी कळविणे गरजेचे होते. दोनदा अर्जाद्वारे संदर्भिय अर्जाची प्रत मागवून देखील देण्यात आली नाही. सुनावणीस हजर राहण्यासाठी विनंती करून वेळ मागवून घेतली व १७ मे रोजी ३ वाजता वेळ दिली. प्रत्यक्ष हजर राहून देखील प्रशासकीय बैठकांचे कारण देत संबंधितांनी ५ वाजवले.

अपिलकर्ते उमेश शिंदे यांना वेठीस धरत त्यांचे मानसिक खच्चीकरण केले गेले व सुनावणी पुढे ढकलण्यात आली. उपसंचालक संजय डोर्लीकर यांनी जबाबदारीने सुनावणीस प्राथमिकता देणे आवश्यक होते. सामान्य जनतेला जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांकडूनच कायदे पायदळी तुडवत तुच्छ वागणूक मिळत असल्याची खंत शिंदे यांनी व्यक्त केली आहे. तसेच घडलेल्या प्रकाराबाबत अपिलकर्त्याला आर्थिक, शारीरिक, मानसिक त्रास झाल्याबाबत राज्य माहिती आयोगाकडे व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्याकडे दाद मागणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले आहे.

# प्रवासी भरण्याच्या वादातून रिक्षा चालकाला मारहाण

### कोयता दाखवून दिली जीवे मारण्याची धमकी; दोघांवर गुन्हा दाखल

नगर - प्रवासी भरण्याच्या वादातून माळीवाडा येथे दोघांनी रिक्षा चालकाला दांडक्याने मारहाण केली. कोयता दाखवून जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली. गणेश भाऊसाहेब आटोळे (वय ३९, रा. कवडे गल्ली, नालेगाव) असे मारहाण झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबावरून कोतवाली पोलीस ठाण्यात दोघांविरूध्द शनिवारी (दि.१८) रात्री मारहाण, आर्म ॲक्ट आदी कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अय्याज हसन शेख, जावेद हसन शेख (दोघे रा. पंचपीर चावडी, माळीवाडा) असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. आटोळे यांच्याकडे रिक्षा असून ते शुक्रवारी (दि. १७) दुपारी साडेबाराच्या सुमारास माळीवाडा परिसरातील लकी हॉटेलसमोर प्रवासी भरत असताना त्यांचे अय्याज व जावेद सोबत वाद झाले.

या वादातून अय्याज व जावेद यांनी त्यांच्या रिक्षातून लाकडी दांडके आणून आटोळे यांना मारहाण करून जखमी केले. शिवीगाळ करून रिक्षातील कोयता दाखवून जिवे ठार मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक के. एस. कपिले करत आहेत.

## बसस्थानकावर महिलेचे गंठण चोरीस

नगर - शहरातील पुणे बस स्थानकावर बसमध्ये चढत असताना महिलेच्या गळ्यातील १ तोळा ३ ग्रॅम वजनाचे सोन्याच्या चेनचे गंठण अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना शनिवारी (दि. १८) सायंकाळी सव्वा चार ते साडेचारच्या दरम्यान ही घटना घडली.

याप्रकरणी माधुरी संतोष वासकर (वय ४१ रा. संतकिसनगिरीनगर, पाईपलाईन रस्ता, सावेडी, मुळ रा. क्रांतीनगर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी माधुरी वासकर या शनिवारी सायंकाळी बाहेरगावी जाण्यासाठी पुणे बस स्थानकावर आल्या होत्या. त्या सव्वाचार ते साडेचार वाजेच्या दरम्यान बसमध्ये बसत असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्याने १ तोळा ३ ग्रॅम वजनाचे सोन्याच्या चेनचे गंठण लांबविले.

सदरचा प्रकार माधुरी यांच्या लक्षात येताच त्यांनी पुढील प्रवास रद्द करून कोतवाली पोलीस ठाणे गाठले. त्यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अंमलदार एस. एस. डाके अधिक तपास करत आहेत.

# नगरमधील २ तरुणांचा जलाशयात बुडून मृत्यू

### एकाचा मृतदेह रविवारी सायंकाळी तर दुसऱ्याचा सोमवारी सकाळी सापडला

नगर - पारनेर तालुक्यातील कर्जुले हर्या जवळील मांडओहोळ जलाशयात फिरायला गेलेल्या नगरमधील ६ पैकी दोघा तरुणांचा रविवारी (दि.१९) दुपारी पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. दोघांपैकी एकाचा मृतदेह पाण्यातून संध्याकाळी बाहेर काढण्यात प्रशासनाला यश आले होते. तर दुसऱ्या मृतदेहाचा शोध सायंकाळपर्यंत सुरू होता. अखेर सोमवारी (दि.२०) सकाळी नऊच्या दरम्यान दुसरा मृतदेह ही सापडला आहे.

अथर्व श्रीनिवास श्रीराम (वय १८) व सौरभ नरेश मच्छा (१८, दोघेही रा. शिवाजीनगर, नगर-कल्याण रोड) असे दोघा मयत तरुणांची नावे आहेत.



अथर्व श्रीराम



सौरभ मच्छा

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, नगर शहरातील नगर-कल्याण रस्ता परिसरातील शिवाजीनगर भागातील मयत अथर्व श्रीनिवास श्रीराम, मयत सौरभ नरेश मच्छा यांच्यासह चैतन्य बालाजी सापा (रा. शिवाजीनगर, कल्याण रोड), आकाश अनिल हुंदाडे , जीवन दिनेश पाटील (रा. रेल्वे स्टेशन, आगरकर मळा), अभिलाष रघुनाथ सुरम हे सहा जण दुचाकीवरून रविवारी (दि.१९) पारनेर तालुक्यातील निघोज येथील मळगंगा देवी मंदिर, कुंड परिसरात फिरायला गेले होते.

तेथून त्यांनी मांडओहोळ जलाशयाकडे जाण्याचा निर्णय घेतला. तेथे पोहोचल्यावर दुपारी तीन ते चारच्या दरम्यान अथर्व श्रीराम, सौरभ मच्छा पाण्यात पोहोण्यासाठी उतरले. पोहत असताना त्यांना पाण्याचा अंदाज आला नाही. त्यामुळे ते पाण्यात बुडाले. त्यानंतर इतर मित्रांनी आरडाओरडा करत मदतीसाठी धावा केला. या घटनेची माहिती परिसरातील नागरिकांना मिळाल्यावर त्यांनी पारनेर पोलिसांना कळविली.

माहिती मिळताच पारनेर पोलीस घटनास्थळी आले व पोलिसांनी आणि इतरांनी बुडालेल्या तरुणांचा शोध सुरु केला. सायंकाळी उशिरा अथर्व श्रीराम याचा मृतदेह पाण्यातून वर काढण्यात यश आले, मात्र सौरभ मच्छा याचा मृतदेह सापडला नाही. रात्री अंधारामुळे शोध कार्य थांबवून सोमवारी सकाळपासून पुन्हा सुरु करण्यात आले.

अखेर सकाळी ९ वाजेच्या सुमारास सौरभ मच्छा याचा मृतदेह सापडला.

# गृहिणी

## आरोग्य

### गुलाबाचे आरोग्यदायी लाभ

गुलाबाच्या फुलाच्या पाकळ्या चावल्याने किंवा उकळून तयार केलेल्या काढ्याने गुळण्या केल्याने आराम मिळतो. रात्रभर वाळलेल्या गुलाबाचं फुल पाण्यात भिजवून ठेवावे. सकाळी चुरगळून पाणी गाळून घ्यावें. यात दोन चमचे साखर मिसळून प्यावे. याने पोटातील उष्णता कमी होते आणि आराम मिळतो.

## पाककला

### मलई पेढा

**साहित्य** – गाईचे दूध एक लिटर, अर्धी वाटी दही, अर्धी वाटी साखर, दोन मोठे चमचे कॉर्नफ्लोअर, अर्धा चमचा वेलदोडापूड, दोन चमचे बदाम–पिस्ते काप, सहा–सात केशराच्या काड्या चुरून.

**कृति** – अर्धी वाटी दूध बाजूला काढून उरलेलं दूध तापायला ठेवावं आणि आटवून निम्मे करावे. दही चमच्याने फेटावे. फेटताना त्यात बाजूला ठेवलेल्या दुधातले दोन चमचे दूध घालावे. आटवलेल्या दुधात साखर घालून गॅस जरा मोठा करावा. उकळी आली की फेटलेल्या दह्याची धार त्यात धरावी व मंद आचेवर ढवळत राहावे.

दूध फाटले की कॉर्नफ्लोअर व उरलेले गार दूध एकत्र करून त्यात ओतावे. सतत ढवळावे. पुन्हा गॅस मोठा करावा. मिश्रण घट्ट होऊन खव्यासारखे दिसायला लागले की उतरवावे. त्यात वेलदोडापूड मिसळावी. गार झाल्यावर हव्या तेवढ्या आकाराचे पेढे वळावेत व त्यावर चुरलेले केशर, बदाम–पिस्ते काप लावून सजवावे. बिस्कीटकटरे हवा तो आकारही देता येतो.

## सल्ला

### सौंदर्य राखण्यासाठी

प्राचीन आयुर्वेद सांगते की, योग्य आहार घ्या. दिनचर्या रेखीव ठेवा. जागरण टाळा. सहा तासांची सलग झोप घ्या. मन प्रसन्न ठेवा म्हणजे वृद्धत्व दूर राहील. नुसत्या सौंदर्य प्रसाधनाच्या पेलणाने सौंदर्य टिकणार नाही. सुरकुत्या येत राहतील. कोवळीक नष्ट होईल. रोज किमान १०–१२ ग्लास पाणी पोटात कसे जाईल ते पहा. शरीरातल्या पेशींना पाण्याची गरज असते. त्यात जर तहानलेल्या राहिल्या तर तुमचे सौंदर्य ओसरू लागेल.

## सौंदर्य

* लिंबोळ्याच्या बिया ताकात वाटून चेहऱ्यावर चोळल्यास काळवंडलेपणा हटतो.
* तांदूळ धुतलेल्या पाण्यात जायफळ उगाळून लावावे, मुरमे सुकतात.

## वास्तू

* स्नानगृह व शौचालयाच्या भिंतींना नेहमी पांढरा, फिकट निळा आणि आकाशी असे फिकट रंग द्यावेत.
* एखाद्या टीपॉयवर किंवा कपाटावर मुख्य दरवाजाकडे तोंड करून लॉफिंग बुद्धाची मूर्ती ठेवावी. जमिनीवर ठेवू नये.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

**मंगळवार, दि. २१ मे २०२४**

श्रीनृसिंह जयंती, शके १९४६ क्रोधीनाम संवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, स्वाती अहोरात्र

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

**राशिभविष्य–**

**मेष** : व्यापारिक करार व व्यवहारात सावधगिरी बाळगा. आपण कार्याच्या विषयी गुप्त धोरणे राखून यश मिळवू शकाल. वातावरण उत्साहवर्धक राहील. आपली दूरदृष्टि आणि बुद्धिने अडकलेली कामे पूर्ण होतील.

**वृषभ** : पळापळ अधिक राहील. शेयरच्या विषयामध्ये सावधगिरी बाळगा. महत्वाकांक्षा पूर्ण झाल्यामुळे आनंद वाटेल. सामाजिक मान–सन्मान वाढेल. आपल्या महत्वाकांक्षेमुळे यश मिळू शकेल.

**मिथुन** : आरोग्याच्या दृष्टीने दिवस उत्तम व्यतीत होईल. जीवनात नव्या सुरुवातीसाठी उत्तम वेळ आहे. वाहनसुख मिळेल. मनोरंजनावर खर्च होईल. सामाजिक यश. नवीन कार्य सुरू करू नका. विरोधकांपासून दूर रहा.

**कर्क** : आपणास आपल्या एकाग्रतेच्या शक्तीतून काहीतरी शिकायला मिळेल आणि आपण जे काही शिकला असाल ते सांगू शकाल. कोणतेही कार्य पूर्ण करण्यापूर्वी यथायोग्य विचार करा. यश मिळणार नाही.

**सिंह** : धन लाभचे उत्तम योग संभवतात. कार्यात पत्नीचा आधार मिळेल. माहितीच्या माध्यमाने आनंदाची बातमी मिळेल. आज व्यापार–व्यवसायात स्थिती मध्यम राहील. व्यापारिक लाभ आणि सुख–समृद्धि वाढेल.

**कन्या** : नोकरीपेशा व्यक्तींना आकस्मिक धनलाभ मिळू शकतो. विशेष कार्य पूर्ण होतील. मित्रांकडून सहकार्य मिळू शकेल.

**तूळ** : राजकीय वातावरण आनंददायक राहील. शत्रू पराभूत होतील. वडिलधाऱ्यांचा सहयोग प्राप्त होईल. शांत रहा. व्यापारात नवीन करार होतील. ार्थिक आणि सामाजिक कामांमुळे अडथळे. कामांची गती मंदावेल.

**वृश्चिक** : भावनेच्या आहारी जाऊन कोणतेही निर्णय घेऊ नका. आरोग्य नरम–गरम राहील. अधिकाऱ्यांशी संभाषणात सावधगिरी बाळगा. वेळ सत्कारणी लागेल. राहत्या जागेसंबंधी अडचण राहू शकते.

**धनु** : एखाद्या कार्यात स्त्री पक्षाकडून सहयोग मिळेल. नोकरीपेशा व्यक्तींना अकस्मात लाभ मिळेल. अनपेक्षित फायदा करून देणाऱ्या काही घटना घडतील. आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**मकर** : प्रेम व रोमांसमध्ये वेळ खर्च होईल. कला–क्षेत्रात एखादे महत्वपूर्ण यश मिळेल. खाणे–पीणे काळजीपूर्वक करा. जबाबदारीचे कार्य मिळतील. योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल.

**कुंभ** : आर्थिक प्रश्नांचे निराकरण होईल. कोणतेही कार्य घाईगर्दीत करणे टाळा. शेयर व इतर कुठेही गुंतवणूक टाळा. काही नवीन संधी मिळतील. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल.

**मीन** : निराशा वाढेल. कोणतेच काम सुरळीत होणार नाही. प्रलोभनांना भुलू नका. देवाण–घेवाण सावधगिरीने करावे लागतील. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# शब्दगंध क्र. ६९२७

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द** – १) भारतातील एक घटक राज्य ३) माघारी; परत ६) परंपरेने चालत आलेले ७) निरर्थक बडबड किंवा वटवट ९) गव्हाचे कणीदार पीठ १०) पाणी; जल; जीवन १२) घोडे जोडलेले देवादिकांचे वाहन १४) अनेक कुटुंबे राहत असलेले मोठे घर १५) जवळ; नजीक १७) वाईट सवय; खोड १९) एक मराठी आडनाव २०) साखरेचा फुगा २१) पिकांवर पडणारा एक रोग; खवा २२) एक निवृत्त पाकिस्तानी क्रिकेटपटू

**उभे शब्द** – १) एक फूल २) तपास करणारा ३) उपयोग ४) कुटुंब; खटले; फॅमिली ५) पाढ्यातील सहाची संज्ञा ८) कापडचोपड; वस्त्रप्रावरण ११) पत्त्यातील एक डाव १३) थकलेले; बाकी; शेष १६) एक चर्मवाद्य; मृदंग; पणवानक १८) तशा प्रकारचा; तसला २०) एक प्रवासी वाहन २१) मामाची बायको

**शब्दगंध क्र. ६९२६ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अं | दा | ज | ■ | पा | भ | र | ■ |
| द | र | व | डा | ■ | ग | ण | क |
| मा | ■ | स | क | वा | र | ■ | वा |
| न | भ | ■ | घ | र | ■ | सो | य |
| ■ | व | खा | र | ■ | का | म | त |
| वि | सा | र | ■ | पा | र | वा | ■ |
| रा | ग | ■ | घ | ■ | खा | र | ट |
| म | र | ■ | सा | म | ना | ■ | न |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : पुण्य ते जाणा रे, भाईनो परउपकाराचे. – **संत तुकाराम.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### अंतराळवीर अन्न कसं पचवतात?

आपल्याला आपण खाल्लेलं अन्न पचवताना जड जात नाही. आपल्या शरीराची ती एक अनैच्छिक क्रिया आहे. म्हणजे अन्नपचन आपोआप होत असतं. त्यासाठी सामान्यतः आपल्याला काही जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागत नाहीत. मग अंतराळवीराच्या बाबतीतच हा प्रश्न का उठावा? सर्वसामान्यपणे अंतराळात गुरूत्वाकर्षण नसतं असा समज आहे. अंतराळवीरांना आपल्या यानात तरंगत असताना टीव्हीवर आपण पाहिलेलं असतं. तिथे जर काडी पेटवून ज्योत निर्माण केली तर ती वर उफाळत नाही. तिथल्या तिथंच घोटाळत राहते. त्यामुळं अन्न, पाणी सगळंच तरंगत असणारं असं आपण समजतो. ते तसं खरंही आहे. म्हणूनच मग, अंतराळवीर पाणी कसं पितात? प्यालेलं पाणी किंवा खाल्लेला अन्नाचा गोळा खाली पोटात कसा उतरतो? असा प्रश्न पडतो. आणि अन्न पचण्यासाठी ते आधी जठरात उतरायला हवं. तसं झालं तरच तिथं मग अन्नपचनाच्या रासायनिक प्रक्रियेला सुरूवात होईल. म्हणूनच हा प्रश्न आपल्याला पडतो.

खरंतर जमिनीवरही केवळ गुरूत्वाकर्षणाच्या प्रभावापोटी आपण घेतलेला घास जठरात उतरत नाही. आपल्या अन्ननलिकेला जोडलेले स्नायू आकुंचन–प्रसरण पावत तो पुढंपुढं सरकवत राहतात. तेव्हा अंतराळातही स्नायूंची तीच प्रक्रिया पार पडत असते. अन्न घन असतं. ते आपण तोंडात सरकवत असतो. नुसतंच हवेतून ते तोंडात पडत नाही. तिथंही ते चावलं जाऊन लाळेत मिसळतं. आणि मगच लगदा पुढे सरकतो. अंतराळातही तीच प्रक्रिया पार पडते. त्यात कोणतीही अडचण येत नाही. पाणी किंवा कोणताही द्रवपदार्थ पिताना काही वेळा गुरूत्वाकर्षणाचा प्रभावच कारणीभूत ठरतो. तर त्यासाठी तो द्रवपदार्थ स्ट्रॉसारख्या नळीतून तोंडात ओढून घेता येतो आणि पुढंही मग केवळ गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावाखाली त्याची पुढची वाटचाल न होता अन्ननलिकेच्या स्नायूंच्या करामतीपोटी तो जठरात उतरतो.

अंतराळात गुरुत्वाकर्षणाच्या बलाची मात्रा क्षीण असते, त्यामुळे अंतराळवीरासकट सगळ्याच गोष्टी तरंगतात. त्यामुळं जेवणाचं ताट किंवा त्यातले पदार्थ तरंगत दूर जाऊ नयेत म्हणून ते घट्ट करून ठेवावे लागतात. जशी तूपसाखर पोळी खाताना ती गुंडाळी आपण धरून ठेवतो तशी. तेवढी बाब सांभाळली की अंतराळातलं क्षीण गुरूत्वाकर्षण अन्नपचनाच्या आड अजिबात येत नाही.

### कृतघ्न मधमाशा

एका माणसाने आपल्या बागेत मधमाशा पाळल्या होत्या. तेथे मधमाश्यांनी मधाची पोळी तयार केली. पोळी चोरीला जाऊ नयेत, म्हणून मालक नेहमी त्याकडे लक्ष देत असे.

एकदा मालक खरेदीसाठी शहरात गेला असता एका चोराने मधमाश्यांची पोळी चोरून नेली. मालक शहरातून परत येऊन पाहतो, तर पोळी चोरीला गेलेली दिसली. ती कोणी चोरली असावीत, असा विचार तो करीत असता मध गोळा करायला गेलेल्या मधमाशा तेथे आल्या. आपली पोळी जागेवर नाहीत असे पाहताच त्यांच्या रागाचा पारा चढला. यानेच पोळी चोरली, असा समज करून त्यांनी मालकावर हल्ला चढवून त्याला चावण्यास सुरुवात केली.

तेव्हा मालक त्यांना म्हणाला,

''अरे कृतघ्नांनो, ज्याने तुमची पोळी चोरून पळवली, त्याला दिले सोडून, आणि मी तुमचा मालक.

तुमची पोळी चोरीला गेल्याचे पाहून आता तुमची राहण्याची काय व्यवस्था करावी, या चिंतेत असताना तुम्ही माझ्यावरच हल्ला करून मला डसता? वा रे तुमचा न्याय?

**तात्पर्य** : कधी कधी गैरसमजाने आपल्या हितचिंतकालाच आपण त्रास देतो. हा आपला मूर्खपणाच नाही का?

## जीवन चक्र



बहुत बार घर के बाहर इंसान कोई मूर्ति लगा देता है, कोई और चीज़ लगा देता है और एक दो साल के बाद वह इतनी मैली हो जाती है कि पहचान में नहीं आ पाती कि वह कौन सी मूर्ति है। यदि उसे साफ़ किया जाए, धोया जाए, तो वह उस अवस्था में आ जाती है, जैसी वह पहले थी। इसी प्रकार महापुरुष हमें समझाते हैं कि जो हमारी रूह है, उस पर कई परदे चढ़े हैं, कई परतें हैं, mind, matter Am¡a illusion (मन–माया) की, उनसे इंसान ढका हुआ है। उनसे ढकने के कारण ही इंसान अपने सही रूप को नहीं देखता है और न ही पहचानता है, बल्कि जिन परदों से हम ढके हैं, उन्हीं को हम अपना आपा समझते हैं।

अपने आप को हम किस प्रकार जान सकते हैं, उसी के बारे में गुरु अर्जनदेव जी महाराज फ़रमा रहे हैं कि वह जो अमृत है, जब वह हमारी जिंदगी का हिस्सा बनेगा और जब हम उसका अनुभव करेंगे, उसे पीयेंगे, तो हम अपने आप साफ़ होना शुरू हो जायेंगे। सभी महापुरुषों ने बार–बार फ़रमाया है कि इस जिंदगी में आने का ध्येय यही है कि हम अपने आप को सही रूप में जानें। हमारा सही रूप शारीरिक नहीं, मानसिक नहीं, बल्कि आत्मिक है।

सही मानो में हम एक रूह हैं, आत्मा हैं, वह आत्मा जो प्रभु की अंश है, वह आत्मा जो प्रभु से उत्पन्न हुई है, वह आत्मा जो चेतनता से भरपूर है, लेकिन इस जड़ता की दुनिया में रहकर, प्रभु से बिछुड़कर, अलग–अलग योनियों में चक्कर लगाकर अपने आपको भूल चुकी है। अपने आप को इंसान किस प्रकार जान सकता है?

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

फिर जब केले बाहर निकलते हैं तब भी खेती में बहुत पवित्र और शक्तिशाली वातावरण बनायें। परमात्मा की सर्व शक्तियाँ केले की फसल में किरणों के रूप में प्रवाहित हो रही हैं... जो सात्विकता और पौष्टिकता को बढ़ा रही हैं... ऐसा अनुभव करें।

इसी प्रकार जो भी फसल, वृक्ष, वनस्पति हों उन सबको कम से कम रोज़ १० मिनट योग का प्रयोग करके स्नेह से बातें करनी है।

**जब जंगली जानवर या पंछी आकर फसल को नुकसान पहुंचाते हैं तब योग विधि :** स्वयं को स्वमान में स्थित करें... मैं आत्मा परम पवित्र हूँ... । पवित्रता के सागर परमात्मा से मैं आत्मा भरपूर हो रही हूँ... ये पवित्र किरणें फसलवाली खेती में प्रवाहित हो रही हैं...।

खेती का वातावरण बहुत ही शुद्ध पवित्र बन रहा है... । खेती के चारों ओर तथा ऊपर भी पवित्र ऊर्जा का ओरा (कवच) बन गया है... और इस ओरा के अन्दर कोई भी नुकसान करनेवाले पंछी अथवा जानवर प्रवेश न करें...। अगर आयेंगे भी तो उनको जितना आवश्यक है उतना एक ही जगह खाकर निकल जायें... पूरे खेती में थोड़ा थोड़ा खाकर नुकसान न करें...।

**प्राकृतिक बदलाव के कारण होनेवाले नुकसान से फसल को सुरक्षित रखने के लिए :** मैं आत्मा प्रकृति का मालिक हूँ... प्रकृतिपति परमात्मा से सर्व शक्तियों की किरणें मुझ आत्मा में समा रही हैं...।

मेरे नयनों से प्रकृति के पाँचों तत्वों में प्रवाहित हो रहे हैं... । पाँचों तत्व शान्त, शुद्ध और शक्तिशाली बनते जा रहे हैं...। मैं आत्मा मास्टर प्रकृतिपति हूँ, मेरे मस्तक एवं नयनों से परमात्मा की सारी शक्तियों की किरणें निकलकर खेती के ऊपर और चारों और छत्रछाया के रूप में ओरा बनाकर खड़ी हैं... इस छत्रछाया के अन्दर यह फसल तेज धूप, अथवा तेज बरसात अथवा जोर से बहनेवाली हवा में भी सुरक्षित है... । प्रकृति के पाँचों तत्व को भी इमर्ज करके फसल की सुरक्षा के लिए आव्हान करके सकाश देकर सहयोगी बनायें... ।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**डॉक्टर :** बाळा आ कर आ
**आई :** त्याला फक्त इंग्लिश कळतं
**डॉक्टर :** बरं, बाळा, 'ओपन योर माऊथ'
**आई :** थांबा, मी सांगते. 'बाळा, डू आ, डू आ...
'सेमी इंग्लिश' आहे तो...

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



जीवनमान उंचविण्यासाठी
प्रत्येक स्थित्यंतरावर
त्याचे पूर्णत्व अवलंबून असते
फूल त्याबरोबरच फळाचेही महत्त्व असतेच

**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

या शस्त्रक्रियेनंतर काही दिवस विश्रांती घ्यावी लागते. त्यानंतर दैनंदिन व कष्टाची कामे पुरुष करू शकतो. परंतु समाजातील अज्ञाना मुळे पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया जास्त प्रमाणात केल्या जात नाहीत. संततिप्रतिबंधक उपायांमध्ये पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेपेक्षा स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया जास्त प्रमाणात होतात.

खरे तर बाळंतपणामध्ये स्त्रियांच्या शरीराची जास्त झीज झालेली असते. त्यामुळे पुरुषांनी म नाचा मोठेपणा दाखवून पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करून घ्यावी. यासाठी रुग्णालयात फक्त एक दिवस राहावे लागते. या शस्त्रक्रियेमध्ये शुक्राणूवाहक नळी ज्या ठिकाणी कापली जाते तेथून पुढे बरीच लांब नळी शिल्लक असते. त्यानंतर वीर्यकोष असतात. यामध्ये आधीच पोहोचलेले शुक्रजंतू गर्भधारणा होण्यास कारणीभूत ठरतात. अशा वेळी शुक्रजंतू पूर्णपणे निघून जाईपर्यंत दुसरा कोणता तरी संततिप्रतिबंधक उपाय तात्पुरता वापरावा. तीन महिन्यांमध्ये हे सर्व शुक्रजंतू शरीराबाहेर वीर्यामार्फत टाकले जातात. त्यानंतर वीर्याची तपासणी करून त्यात शुक्रजंतू नाहीत ना याची पूर्ण खात्री करून मगच कुठलेही साधन न वापरता शारीरिक संबंध ठेवावेत. पुरुष नसबंदीमध्ये ही काळजी घेणे फार महत्त्वाचे असते.

गर्भधारणेसाठी योग्य वेळी दोन अपत्यांमध्ये योग्य अंतर ठेवण्यासाठी या साधनांचा वापर करावा. आणि अपत्यप्राप्ती झाल्यानंतर कायमस्वरूपी स्त्री किंवा पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करून घ्यावी. स्त्री जीवनावरील पुस्तक लिहिताना स–गर्भावस्था हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे.

**न मातु: परम् दैवतम् ।**

मातेपेक्षा श्रेष्ठ असे कोणतेही दैवत सृष्टीमध्ये नाही, असे सुभाषितांमध्ये म्हटले आहे. माता स्वत:च्या शरीराची नऊ महिने झीज करुन, स्वत:च्या जीवाची पर्वा न करता बाळाला जन्म देते. परंतु हा संपूर्ण प्रवास सुखकर होण्यासाठी गर्भधारणेपूर्वीपासूनच आरोग्याची काळजी घेणे गरजेचे असते. म्हणूनच भावी माता–पित्याने गर्भधारणेपूर्वीच डॉक्टरांचे मार्गदर्शन घेऊन उपाययोजना करावी.

**गर्भधारणेपूर्वी घ्यावयाची काळजी**

बऱ्याच वेळेला जन्मत:च विकृती असलेले बाळ जन्मास येणे, बाळ मतिमंद, अपंग जन्मास येणे, दोन–तीन महिने गर्भधारणा झाल्यानंतर गर्भपात होणे असे दु:खद अनुभव काही दांपत्यांमध्ये वारंवार येत असतात. असे अनुभव आपल्या आयुष्यात येऊ नयेत म्हणून गर्भधारणेपूर्वीच तीन महिन्यांपासून काळजी घ्यावी लागते. यामध्ये पती–पत्नीचे रक्त, लघवी यांची तपासणी महत्त्वाची ठरते. तसेच पंचकर्मातून बीजशुद्धी, सात्त्विक आहारविहार, योगासने, वीर्य तपासणी, सोनोग्राफी या सर्व तपासण्या करून आरोग्य चांगले आहे ना याची खात्री करून घ्यावी.

बऱ्याच वेळेला रक्त, लघवी तपासणीत दोष आढळतो. त्यावरील योग्य उपचार झाल्यानंतरच डॉक्टरांच्या सल्ल्याने गर्भधारणा राहू द्यावी.

**गर्भावस्थेमधील काळजी :**

**आहार** : गर्भावस्थेमध्ये पहिल्या तीन महिन्यांत बऱ्याच जणींना उलट्यांचा त्रास होतो. अशा अवस्थेत पाणीसुद्धा पचत नाही. औषधोपचार केला तरीही काही जणींना उलटी व मळमळीचा त्रास होतो. तो होऊ नये म्हणून डॉक्टरांच्या औषधोपचारांबरोबरच काही पथ्य पाळण्याची गरज असते. उदा. रात्रीच्या जेवणानंतर जवळजवळ सात ते आठ तास पोट रिकामे असते. त्यामुळे साहजिकच अन्न पचवण्यासाठी तयार झालेले पित्त जठरामध्ये साठून राहते. सकाळी उठल्यावर नेहम ीच्या सवयीने चहा पिला जातो. रात्रभर साचलेले पित्त व त्यावर परत सकाळी घेतलेला चहा यामुळे पित्त अजूनच वाढते व हमखास उलटी होते.

(क्रमश:)

**– डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं– ८७९३४००४००

# महानगरपालिका कर्मचारी पतसंस्थेला चालू आर्थिक वर्षासाठी ऑडिट वर्ग अ प्राप्त

## चेअरमन किशोर कानडे यांची माहिती; अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेचा ११२ व्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन



अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या ११२ व्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन करताना चेअरमन किशोर कानडे, व्हा. चेअरमन सोमनाथ सोनवणे व संचालक मंडळ. (छाया - लहू दळवी)

नगर - अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेला ११२ वर्षाची परंपरा असून संचालक मंडळाने सभासदाच्या हिताचा चांगला कारभार केला असून अडीअडचणी वर मात करीत पतसंस्था स्व-भांडवली केले आहे. सभासदाच्या जोरावर पतसंस्थेची प्रगती होत असून यावर्षी सभासदांना १२ टक्के प्रमाणे डीव्हीडंट वाटप करण्यात येणार आहे.

सभासदांच्या मुला मुलींच्या शिक्षणासाठी व लग्न समारंभासाठी तातडीने कर्ज रूपी आर्थिक मदत केली जाते याचबरोबर आरोग्याच्या उपचारासाठी २५ हजाराची मोफत मदत दिली जाते सभासदाच्या गुणवंत पाल्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित केला जातो. याच बरोबर मनपाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार केला जातो. मनपा कर्मचारी पतसंस्थेने चालू आर्थिक वर्षात चांगला कारभार केला असल्यामुळे ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त झाला असल्याची माहिती चेअरमन किशोर कानडे यांनी दिली.

अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेचा ११२ वा वार्षिक अहवालाचे प्रकाशन झाले. यावेळी चेअरमन किशोर कानडे, व्हा.चेअरमन सोमनाथ सोनवणे, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, सतीश ताठे, विकास गीते, श्रीधर देशपांडे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, बाळासाहेब पवार, विजय कोतकर, कैलास चावरे, गुलाब गाडे, बाळासाहेब गंगेकर, संचालिका प्रमिलाताई पवार, उषाताई वैराळ, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी, अकाउंट संतोष गवळी आदी उपस्थित होते.

व्हा. चेअरमन सोमनाथ सोनवणे म्हणाले की, अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेची ११२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २ जून रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक टिळक रोड येथे सकाळी ९ वाजता होणार आहे. तरी सभासदांनी उपस्थित राहावे तसेच ११२ वा वार्षिक अहवाल सभासदांच्या अभ्यासासाठी पाठवण्यात आला आहे.

तरी सर्वांनी त्याचा अभ्यास करावा जेणेकरून आपल्या सर्वांना आपली पतसंस्था यशाच्या शिखराकडे घेऊन जाण्यास मदत होईल. यासाठी अहवालाचे प्रकाशन करण्यात आले असल्याचे ते म्हणाले.

# जीवनज्योत इंग्लिश मिडियम स्कुल व ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

नगर - बॉम्बे बेकर्स समोर / बॉम्बे हॉस्पीटल बिल्डींग, फॉरेस्ट ऑफिसमागे, नगर औरंगाबाद रोड, नगर येथील जीवनज्योत इंग्लिश मिडीयम स्कुल व ज्यूनिअर कॉलेजची प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्याची माहीती प्राचार्य यांनी दिली.

प्ले ग्रुप नर्सरी, एल. के. जी., यू. के.जी, तसेच पहीली ते १२ वी सायन्स (एम.सी.व्ही. सी.) या वर्गासाठी प्रवेश देण्यात येत आहे. प्ले ग्रुप साठी दोन +, नर्सरीसाठी तीन +, एल के जी साठी चार +, यु के जी साठी पाच+ वर्षे बालकांसाठी व पहिली ते १२वी सायन्स (एम. सी.व्ही.सी) वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.

जीवनज्योत स्कूल व ज्यूनिअर कॉलेजमध्ये प्रशस्त क्लासरूम, अभ्यासासाठी स्वच्छ व निरोगी वातावरण, शिकविण्याचे नव्या पध्दती जसे ऑडीयो अँडस्, इ लर्निंग पॅटर्न, ग्रंथालय व खेळणी याव्दारे शिकविले जाते. तसेच कॉम्प्युटरचेही प्रशिक्षण दिले जाते. शिक्षणाच्या व्यतिरिक्त कला, खेळण्याचे वेगवेगळ्या सुविधा, हस्तकला, चित्रकला यांचे प्रशिक्षण दिले जाते. खेळातुन मूलांना शिक्षणाची आवड निर्माण केली जाते. सहल आणि प्रदर्शन, अनुभवी व प्रशिक्षीत शिक्षक वर्ग ही शाळेची वैशिष्ट्ये आहे.

नवीन शिक्षण पध्दतीव्दारे विद्यार्थ्यांना डेली लाईफ स्किल एक्सप्रेशन व्होकॅब्युलरी म्युझिक यांच्यासारख्या शिक्षणामधून विद्यार्थ्यांना क्रिएटीव्हीटी व कॉन्फिडन्स मिळतो. त्याचप्रमाणे वाद्यांचे प्रशिक्षण दिले जाते. वेळोवेळी आरोग्य तपासणी व प्रत्येक महिन्याच्या विद्यार्थ्यांना प्रोग्रेस रिपोर्ट, विद्यार्थ्यांची स्ट्रेंन्थ, विकनेस, मुल्यमापन, रिझल्ट पालकांना उपलब्ध करुन दिले जाते.

चांगल्या सवयी व सामाजिक कर्तृत्व शिकविल्या जातात. विद्यार्थ्यांच्या आहारविषयक व गुड हॅबीट सारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी पालक मेळावा आयोजित केला जातो. सुरक्षेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही कॅमेरा व स्कुलव्हॅनची सुविधा उपलब्ध. आहे.

मागासवर्गीय, अनुसुचित जाती व जमाती व अल्पसंख्यांक बालकांना शासन नियमाप्रमाणे पहिलीपासून शिष्यवृत्ती दिली जाते. जीवनज्योत इंग्लिश मिडियम स्कुल व ज्यूनिअर कॉलेजमध्ये प्रवेशासाठी पालकांना बॉम्बे बेकर्स समोर/बॉम्बे हॉस्पीटल बिल्डींग, फॉरेस्ट ऑफिसमागे, नगर औरंगाबाद रोड, नगर येथे सकाळी १० ते दुपारी २ यावेळेत संपर्क साधावा. संपर्क- ८८३०६८५७३२ / ९३७३५६०४५२.

'पद्मशाली युवा शक्ती ट्रस्ट व पद्मशाली महिला शक्ती' यांच्या संयुक्त विद्यमाने

# नगर शहरामध्ये २३ ते २६ मे दरम्यान 'पद्मउद्योजक शॉपिंग महोत्सव'चे आयोजन



नगर - 'पद्मशाली युवा शक्ती ट्रस्ट व पद्मशाली महिला शक्ती' यांच्या संयुक्त विद्यमाने विशेषतः महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी गतवर्षीप्रमाणे याही वर्षी २३ ते २६ मे असा चार दिवस येथील 'श्री मार्कंडेय संकुल' दातरंगे मळा, अहमदनगर येथे 'पद्मउद्योजक शॉपिंग महोत्सव पर्व ४ थे २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे.

समाजातील घरगुती महिला उद्योजकांना, कुटीर उद्योगांना, खाद्य उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी या पर्वाच आयोजन करण्यात आले आहे. याठिकाणी शॉपिंग बरोबरच विविध चटकदार महाराष्ट्रीयन, साऊथ इंडियन, पंजाबी खाद्य पदार्थ, चाट, बेकरी आयटम, ज्वेलरी, आरोग्यदायक प्रॉडक्ट्स, पुस्तके यांच्या सह स्पर्धा, खेळ, धमाल, मस्ती आणि सन्मान सोहळ्याचे ही आयोजन केले जाणार आहे.

शॉपिंग आणि खाद्य जत्रेबरोबरच विविध रंगारंग कार्यक्रमाचे ही या महोत्सवात आयोजन करण्यात आले आहे. ज्यात भारतातील कर्तृत्ववान महिलांची वेशभूषेसह सादरीकरणे हे मुख्य आकर्षण असणार आहे. याव्यतिरिक्त सर्व मुली व महिलांसाठी रील मेकिंग, चित्रकला, व नृत्य स्पर्धा, रोप मल्लखांब या कार्यक्रमाचे ही आयोजन केले जाणार आहे.

सोबतच भेट देणाऱ्या सर्वांना आपण लकी-ड्रॉ कुपन देणार आहोत. त्यातील लकी विजेत्यांना पैठणी साडी, सोन्याची नथ, चांदीचा छल्ला सह भरपूर बक्षिसांची ही लयलूट केली जाणार आहे. तरी नगरकरांनी मोठ्या संख्येने या महोत्सवाला आपल्या कुटुंबासह भेट देऊन खरेदी, मनोरंजन आणि रुचकर पदार्थांचा आस्वाद घेतांनाच बक्षीस जिंकण्याची संधी सोडू नये, असे आवाहन आयोजक पद्मशाली युवा शक्ती व पद्मशाली महिला शक्तीच्या संयोजकांनी केले आहे.



सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे यांचे वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.

# ज्येष्ठांचे अनुभवी मार्गदर्शन नेहमीच बहुमूल्य : संतोष गांधी

## सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे यांचे वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन

नगर - कुटुंब असो की आर्थिक संस्था ज्येष्ठांचे अनुभवी मार्गदर्शन नेहमीच बहुमूल्य असते. आमच्या पतसंस्थेचे संस्थापक स्व. सुवालाल गुंदेचा यांनी एका व्यापक हेतूने संस्थेची स्थापना केली आणि त्याचवेळी समविचारी लोकांना सोबत घेतले. यात शांतीलाल गुगळे अग्रस्थानी होते. भाऊंच्या विचारसरणीला अनुसरून त्यांनी स्थापनेपासून संस्थेच्या प्रगतीसाठी सिंहाचे योगदान दिले आहे. ७८ व्या वर्षीही त्यांचा उत्साह आणि संस्थेप्रती असलेली आपुलकी आदर्शवत आहे. त्यांच्या अनुभवाचा संस्थेला नेहमीच फायदा होतो. कर्ज वसुली, ठेवी वाढ, सभासदांचे हित जपण्यासाठी ते कायम आग्रही असतात. त्यांच्या अनमोल मार्गदर्शनाखाली काम करताना मनस्वी आनंद होतो असे प्रतिपादन चेअरमन संतोष गांधी यांनी केले.

सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे यांच्या ७८ व्या वाढदिवसानिमित्त पतसंस्थेच्या वतीने चेअरमन संतोष गांधी यांनी गुगळे यांचे अभिष्टचिंतन करून सत्कार केला. याप्रसंगी व्हा. चेअरमन समीर बोरा, संचालक अभय पितळे, शैलेश गांधी, चेतन भंडारी, विनित बोरा, विनय भांड, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, उद्योजक अजित बोरा, चंपालाल भंडारी, प्रमोद डागा, उप व्यवस्थापक नयना बोगावत आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

नयना बोगावत म्हणाला की, संस्थेच्या स्थापनेपासून शांतीलाल गुगळे यांचे आदर्श कामकाज अनुभवत आहे. त्यांनी संस्थेत चेअरमन, व्हा. चेअरमन, तज्ज्ञ संचालक म्हणून मोठे योगदान दिले आहे. प्रत्येक सभासदाला ते वैयक्तिक ओळखतात. आम्हांला काही काम सांगितले तर ते पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करतात. संस्था हिताला त्यांचे सर्वोच्च प्राधान्य असते. कामकाजात काही कळत नकळत चुकीच्या गोष्टी झाल्या तर न रागावता ते समजून सांगतात. त्यामुळे खूप शिकायला मिळते. त्यांच्या अभ्यासून वृत्तीचा आम्हाला वैयक्तीक तसेच संस्थेला ही लाभ होतो.

प्रास्ताविक प्रशांत भंडारी यांनी केले. आभार व्हा. चेअरमन समीर बोरा यांनी केले.

# योगतज्ञ दादाजी वैशंपायन राज्यस्तरीय अध्यात्मिक पुरस्कार नारायण भाटे आणि मिलिंद चवंडके यांना जाहीर

## डॉ.धर्मवीर भारती यांची सामाजिक पुरस्कारासाठी निवड, २३ मे रोजी शेवगांवला पुरस्कार प्रदान समारंभ

नगर - योगतज्ञ दादाजी वैशंपायन यांच्या १०५ व्या जयंती उत्सवानिमित्त यावर्षीचा राज्यस्तरीय अध्यात्मिक पुरस्कार नारायण भाटे (पुणे) आणि मिलिंद चवंडके (अहिल्यादेवीनगर) यांना जाहिर करण्यात येत आहे.

डॉ.धर्मवीर भारती (लातूर) यांची सामाजिक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली असून २३ मे रोजी दुपारी ४ वाजता शेवगांवमधील दादाजी वैशंपायननगरमध्ये पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती गुरूदत्त सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि कला व क्रीडा संस्थेचे अध्यक्ष अर्जुनतात्या फडके आणि सचिव फुलचंद रोकडे यांनी दिली.

ते म्हणाले, २०१० सालापासून प्रतिवर्षी हा पुरस्कार प्रदान सोहळा योगतज्ञ संत दादाजी वैशंपायन यांच्या जयंतीस संपन्न होतो आहे. दादाजी वैशंपायन यांनी हिमालयामध्ये राहून खडतर तपश्चर्या केली. अष्ट सिद्धी प्राप्त असूनही ते सामान्यांप्रमाणे राहत असत. १९२० साली बुद्ध पौर्णिमेस नेरे (ता.पनवेल, जि.रायगड) या गावी त्यांचा जन्म झाला. वयाच्या शंभराव्या वर्षी २० मे २०१९ या दिवशी त्यांनी देह त्याग केला. त्यांनी दैवी शक्तीच्या साह्याने दुःखी, कष्टी लोकांचे त्रास दूर केले. अंध, अपंग, मूकबधिर, गरजू विद्यार्थी, समाजसेवी संस्था तसेच मंदिराचा जिर्णोद्धार करणाऱ्या आणि अध्यात्म प्रसाराचे कार्य करणाऱ्या संस्थांना सढळ हाताने देणगी स्वरूपात ते मदत करत असत. शेवगावमध्ये त्यांनी दत्त मंदिर उभारले. श्रद्धेने व निष्ठेने या क्षेत्री येणाऱ्या भक्तांच्या मनोकामना निश्चित पूर्ण होतात अशा अनुभूती अनेकजण घेत आहेत. दादाजींच्या जयंतीचे औचित्य साधून अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्यांना प्रतीवर्षी योगतज्ञ दादाजी वैशंपायन यांच्या नावे राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. विशेष म्हणजे पुरस्कारासाठी प्रस्ताव न मागवता सातत्यपूर्ण निरपेक्ष कार्याची प्रत्यक्ष पाहणी करून निवड केली जाते.

यावर्षीच्या अध्यात्मिक पुरस्कारासाठी पुणे येथील श्रीस्वामी समर्थ कृपांकित नाना भाटे काका आणि नाथ संप्रदायाचे संशोधक तथा प्रवचनकार मिलिंद चवंडके यांची निवड करण्यात आली. भाटे काकांनी स्वामी समर्थांच्या सुरेख मूर्ती हजारो स्वामी भक्तांना भेट






देण्याचे कार्य करताना संजीवनी स्वामीकृपेची ही बखर आणि स्वामी वरद हा स्वामी भक्तांच्या अनुभवांचा अंक प्रकाशित करून स्वामीकृपेच्या अनुभूती आजही भक्तांना येत असल्याचे दाखवून दिले आहे. अंधश्रध्दा नसावी मात्र श्रध्दा असावी, हे सांगणारे भाटेकाका हजारो स्वामी भक्तांचे प्रेरणास्थान आहेत.

मिलिंद चवंडके यांनी श्रीक्षेत्र मढी येथील श्रीकानिफनाथ संजीवन समाधी देवस्थानचे विश्वस्तपद भूषविताना गर्भगिरीतील पहिल्या नाथ संमेलनाचे आयोजन करून अध्यात्मिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवला.

।। श्रीकानिफनाथमाहात्म्य ।। या शुध्द मराठीतील ओवीबध्द रसाळ पोथीचे लेखन केले. या पोथीची पहिली १००० पोथ्यांची आवृत्ती अवघ्या २७ दिवसात संपली. ९३ दिवसात नर्मदेची पायी परिक्रमा पूर्ण करताना आश्रम-मठ-मंदिरांतील साधू-संत-महंत आणि तपस्वींच्या दिव्य सान्निध्यात ते राहिले. अध्यात्मिक पत्रकारितेचे व्रत घेऊन गेली ३२ वर्षे व्रतस्थासारखे कार्यरत राहिले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवारात ४० वर्षे विविध दायित्व सांभाळले. या एकूण कार्याची दखल घेऊन अध्यात्मिक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

डॉ.धर्मवीर भारती हे लातूर येथील निश्चल पुरी फाऊंडेशनचे अध्यक्ष आहेत. त्यांनी बांधकाम व्यवसाय क्षेत्रात डॉक्टरेट पदवी संपादन केली आहे. गेल्या १३ वर्षांपासून ते प्रतीवर्षी १५६ विद्यार्थी शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेतात. २१ जोडप्यांचे सामुदायिक विवाह त्यांनी केले. तीन गोशाळा उभारून भारतीय गोवंशाच्या संरक्षण आणि संवर्धनाचे मौलिक कार्य सुरू ठेवले आहे. आपण जे कमवतो त्यातील १०% भाग सामाजिक कार्यासाठी खर्च करण्याकरिता निश्चल पुरी फाऊंडेशनच्या माध्यमातून ते कार्यरत आहेत.

नाशिक येथील गजानन कस्तुरे आणि मुंबई येथील एमएसडीएल वित्त विभागाचे संचालक अनुदिप दिघे यांच्या हस्ते हे राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या सोहळ्यास आ.मोनिकाताई राजळे, माजी आ.चंद्रशेखर घुले, रिलायन्स ट्रस्टचे व्हाईस प्रेसिडेंट गणेश राममुर्ती, तहसिलदार प्रशांत सांगडे, शरदकाका वैशंपायन, प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल (बीड), उदयकाका देशपांडे (नाशिक), रविंद्र पुसाळकर व प्रशांत दिघे (मुंबई), सार्वजनिक बांधकाम उपविभागीय अभियंता प्रल्हाद पाठक हे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित रहाणार आहेत.

तसेच पं.स.चे मा.सभापती अरूण लांडे, पाथर्डीचे नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, उपनगराध्यक्ष नंदकुमार शेळके, भाजपचे प्रदेश सरचिटणिस अरूण मुंडे, शेवगाव बाजार समितीचे सभापती संजय फडके, ॲड.विजयराव काकडे, सुनिल रासने, महेश फलके हे प्रमुख उपस्थित रहाणार आहेत. पुरस्कार वितरण सोहळ्यास अध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा क्षेत्रासह भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन गुरूदत्त संस्थेचे अध्यक्ष अर्जुनतात्या फडके, सचिव फुलचंद रोकडे आणि पी.बी.शिंदे यांनी केले आहे.

योगतज्ञ संत श्री दादाजी वैशंपायन पुरस्कार जाहीर झालेल्यांचे फोटो :- अध्यात्मिक पुरस्कार :-

१) नारायण भाटे काका (पुणे) आणि - २) मिलिंद चवंडके (अहिल्यादेवी नगर)

सामाजिक पुरस्कार :- १) डॉ. धर्मवीर भारती (लातूर)

# जागतिक मधमाशी दिन

आज २० मे, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. अँतोन जोंसा या जगप्रसिद्ध मधुमक्षिका पालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी स्लोव्हेनिया या देशातील गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांनी १७६६ मध्ये युरोपात पहीले मधमाशी पालन केंद्र सुरू केले. १७७१ मध्ये त्यांनी मधुमाशीपालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ पासून २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून घोषित केला. या दिवशी मधमाशांचे संवर्धन करण्यासह कीटकांचे संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली जाते. मधमाशी हा पर्यावरणातील अतिशय महत्वाचा घटक आहे. मधमाशी हे जीवसृष्टीला मिळालेले सर्वोत्तम वरदान आहे.

मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते. मधमाशा इतर किटकांप्रमाणे एकट्या दुकट्या राहत नाही तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात. मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे, त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत. तरीही मधमाशीपालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत उलट मधमाशांचे पोळे जाळून त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा कल असतो. पूर्वी शेतात, बांधावर, आजूबाजूला सहज नजरेस पडणारी मधमाशांची पोळे आता दिसत नाही. मधासाठी पोळे जाळणे, कीटकनाशके फवारणे, मोबाईल टॉवर उभारणे, मधमाशांविषयी अज्ञान पसरवणे या कारणांमुळे मधमाशी सारखा उपयुक्त जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील मधमाशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरित परिणाम होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. मधमाशांची शास्त्रीय माहिती घेऊन तिचे संगोपन करण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. पराग सिंचनामुळे शेती उत्पादनात वाढ होत असल्याने मध व मेन या बाबीपेक्षा उत्पादनातील वाढ हा महत्वाचा घटक मानून शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाला अग्रक्रम द्यायला हवा. सरकारनेही याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करायला हवे. रोजगार निर्मितीला वाव असल्याने मधमाशी पालन हा पूरक उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मधमाशी ही आपल्यासाठी अतिशय महत्वाचे काम करते. मधमाशांकडून शिकण्यासारखेही खूप आहे. समूहात राहून आदर्श जीवन कसे जगावे हे मधमाशांकडून शिकावे. दीर्घ कष्ट केल्याने मधासारखा गोड पदार्थ निर्माण करता येतो, हे मधमाशांनी दाखवून दिले आहे. मधमाशी हा केवळ मानवासाठीच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. आपण सर्वांनी मधमाशी वाचवण्याचा पर्यायाने जीवसृष्टी वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तरच मधमाशी दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

# अवतार मेहेरबाबांचा अरणगावच्या प्रेमाश्रमला १०० वर्ष पूर्ण



नगर - नगरच्या जवळील दुर्लक्षित ब्रिटिशकालीन सैन्य वसाहतीमध्ये मेहेरबाबांनी ४ मे १९२३ रोजी बरोबर १०० वर्षांपूर्वी प्रवेश केला होता, दौंड-रोडवर अरणगाव येथे वसलेली एक छोटी वसाहत, रस्त्याच्या दोन्ही बाजूला पसरलेली वसाहत. एका बाजूला लहानशी टेकडी आहे. पहिल्या महायुद्धाच्या वेळी या टेकडीवर ब्रिटिशांनी एक पाण्याची टाकी बांधली होती. त्या टाकीमध्येच मेहेरबाबांनी राहण्याची जागा आणि सभागृह तयार करवून घेतले होते. त्या टाकीमध्ये बांधलेल्या वैशिष्ट्यपूर्ण इमारतीवर आज एक सतरंगा ध्वज फडकताना दिसतो. त्या टेकडीवर मेहेरबाबांची समाधी उभी आहे. अशा या अरणगाव (मेहेराबाद) येथील अवतार मेहेरबाबांचा प्रेमाश्रमला १०० वर्ष पूर्ण झाले आहेत

सेवेतील स्वामित्व' हे अर्थवाही शब्द समाधीच्या दर्शनी भागावर कोरले आहेत. समाधीच्या चार कोपऱ्यांवर चार मोठ्या धर्मांची प्रतीके दिसतात मंदिर, मशीद, आग्यारी आणि ख्रिस्ती क्रॉस. आत गेल्यावर माणसाचे मन निःशब्द होते, करुणा आणि प्रसन्नता यांचा मनात उगम होतो आणि भाविक मेहेरबाबांना शरण जातो. मी शिकवण्याकरिता नव्हे तर जागृत करण्याकरिता आलो आहे हे समाधीवरचे वाक्य मेहेरबाबांच्या कार्याची दिशा स्पष्ट करते.

या ओसाड, दुर्लक्षित ब्रिटिशकालीन सैन्य वसाहतीमध्ये मेहेरबाबांनी १९२३ च्या ४ मे रोजी म्हणजे बरोबर १०० वर्षांपूर्वी प्रवेश केला आणि या क्षेत्राचा कायापालट झाला. हाकेच्या अंतरावर असलेल्या अरणगावामध्ये बहुतांशी गोरगरीब, मागासलेल्या कष्टकऱ्यांची आणि शेतकऱ्यांची वस्ती होती. त्यांच्या शुश्रूषेसाठी आणि शिक्षणासाठी मेहेरबाबांनी पहिली काही वर्षे खर्च केली. अंत्योदयाची मुहूर्तमेढ रचली.

शाळा आणि दवाखाना सर्वांसाठी विनामूल्य सेवा देत. तेथे जाती-धर्माचा भेद नव्हता.स्वतःच्या देखरेखीत या शाळेतील मुलांना शिक्षण दिले आणि त्याचबरोबर सर्व धर्मांचे अंतिम ध्येय एकच आहे हे बिंबवले. त्यांनी स्वतःलिहिलेली'हरी, परमात्मा, अल्ला, अहुर्मझद, गॉड, यझदान, हूही प्रार्थना तेथील मुले रोज तालासुरात म्हणत असत. शाळेला त्यांनी आपल्या गुरूचे नाव दिले'हजरत बाबाजान संकुल'आणि त्यातल्या आध्यात्मिक शिकवणीच्या वर्गाला नाव दिले 'प्रेमाश्रम'.

१९२५-२६ मध्ये मेहेराबाद येथे मेहेरबाबांनी रस्त्यालगतच एक टेबलवजा पिंजरा करून घेतला आणि त्यात बसून आध्यात्मिक गाथेची निर्मिती केली, ज्यात अनेक आध्यात्मिक रहस्यांचा उलगडा त्यांनी केला.हे हस्तलिखित आज गुप्त असले तरी याच विषयावरील त्यांचा गॉड स्पीक्स हा ग्रंथ आज देशी-विदेशी अनेक भाषा मध्ये प्रसिद्ध आहे १९२५ साली १० जुलैला येथूनच मेहेरबाबांनी आपल्या महामौनाला सुरुवात केली. जे मौन त्यांनी आपल्या कार्यकाळाच्या अखेरपर्यंत अबाधित ठेवले.

आज मानवाला शब्दांच्या माध्यमातून दिलेल्या उपदेशाची जरूर नसून मानवाचे हृदयापासून परिवर्तन जरुरी आहे, आणि हे आमूलाग्र परिवर्तनच मानवाला फसव्या मायाजालातून जागृत करू शकेल आणि व्यक्ती- व्यक्तीतील द्वेष, दुरावा दूर होऊन त्यांच्यात परस्पर प्रेमाचा संचार करेल, हा त्यांचा मौन संदेश होता.

जगभर कोठेही गेले तरी मेहेरबाबा मेहेरबादलाच परत येत असत आणि १९४४ पर्यंत हेच त्यांचे प्रमुख वास्तव्य होते. ३१ जानेवारी १९६९ ला मेहेरबाबांनी देहत्याग केला. त्यांचा देह त्यांच्या समाधीत सुपूर्द केला गेला. मेहेरबाबांच्या समाधीचे दर्शन आणि तिथे अजूनही जाणवणारा मेहेरबाबांचा अमृतमय सहवास ही एक विलक्षण अनुभूती आहे

# अर्थजगत

विद्यमान २०२४ आर्थिक वर्षासाठी भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा अंदाज 'संयुक्त राष्ट्रा'ने (यूएन) ६.६ टक्क्यांवरून ७ टक्क्यांपर्यंत वाढवणारा सुधारित अंदाज वर्तविला. देशातील मजबूत सार्वजनिक गुंतवणूक आणि खासगी गुंतवणुकीच्या सुधारत असलेल्या चक्रामुळे विकासाला चालना मिळणार आहे. परिणामी देशाची अर्थव्यवस्था सुमारे सात टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज संयुक्त राष्ट्राचा आहे. तर पुढील आर्थिक वर्षात म्हणजेच २०२५ मध्ये विकास दर ६.६ टक्के राहण्याचा अंदाज आहे. जानेवारी महिन्यात 'यूएन'ने ६.२ विकास दराचा अंदाज व्यक्त केला होता. तर २०२५ साठी पूर्वअंदाज त्याने कायम ठेवला आहे. खाद्यवस्तूंची महागाई वाढण्यासारख्या प्रतिकूल गोष्टी असतानाही देशांतर्गत मागणी वाढत असल्याने विकास दराच्या अंदाजात सुधारणा करण्यात आली आहे.




**देशातील अनेक शहरांमध्ये गेल्या दोन वर्षांत मालमत्तेच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. २०२० मध्ये जेव्हा कोरोना आला तेव्हा मालमत्तेच्या किमती गगनाला भिडल्या होत्या. सुमारे २ वर्षे हीच स्थिती कायम राहिली. कोविडच्या तिसऱ्या लाटेनंतर मालमत्तेच्या किमतीत वाढ झाली आणि आज ती कोरोनापूर्वीच्या परिस्थितीपेक्षा जास्त आहे. गेल्या वर्षभरात अनेक ठिकाणी मालमत्तेच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. रिअल इस्टेट कंपन्यांच्या शेअर्सबद्दल बोलायचे झाल्यास, अनेक कंपन्यांच्या शेअर्सने केवळ एका वर्षात दुप्पट परतावा दिला आहे.**

## घर घ्यावे की समभाग?

रिअल इस्टेट सल्लागार कॉलियर्स इंडिया आणि डेटा ॲनालिटिकल कंपनी लायसेस फोरास यांच्या संयुक्त अहवालानुसार, देशातील आठ प्रमुख शहरांमध्ये घरांच्या किमती १९ टक्क्यांपर्यंत वाढल्या आहेत. बंगळुरूमध्ये सर्वाधिक १९ टक्के वाढ झाली आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये ही वाढ १६ टक्के होती. मालमत्तेतील गुंतवणुकीबद्दल बोलायचे झाल्यास, गेल्या ५ वर्षांत मेट्रो शहरांमधील मालमत्तेची किंमत दुप्पट झाली आहे. मात्र, ही किंमत मेट्रो शहरातील मालमत्तेच्या जागेवर अवलंबून असते. केवळ पॉश भागातच दर दुपटीने वाढले आहेत. जर आपण ग्रामीण किंवा टियर-३ शहरांबद्दल बोललो, तर गेल्या ५ वर्षांत तिथल्या मालमत्तांचे दर ३० ते ४० टक्क्यांनी वाढले आहेत.

**रिअल इस्टेट कंपनीचे शेअर्स एका वर्षात दुप्पट ह्ढ**

रिअल इस्टेट कंपनीच्या शेअर्सने एका वर्षात गुंतवणूकदारांना चांगला परतावा दिला आहे. अशा अनेक कंपन्या आहेत ज्यांनी एका वर्षात १०० टक्क्यांहून अधिक परतावा दिला आहे, म्हणजेच त्यांनी गुंतवलेल्या रकमेच्या दुप्पट वाढ झाली आहे. अशा ४ कंपन्यांकडून मिळालेल्या रिटर्न्सबद्दल जाणून घ्या:

१. डीएलएफ लि.

रिअल इस्टेटमध्ये काम करणारी ही एक मोठी कंपनी आहे. सध्या या कंपनीच्या शेअरची किंमत सुमारे ८५० रुपये आहे. गेल्या एका वर्षात कंपनीने सुमारे ८१ टक्के परतावा दिला आहे. जर तुम्ही वर्षभरापूर्वी यामध्ये १ लाख रुपयांची गुंतवणूक केली असती तर तुम्हाला ८१ हजार रुपयांचा नफा झाला असता आणि तुमची एकूण रक्कम १.८१ लाख रुपये झाली असती.






**२. मॅक्रोटेक डेव्हलपर्स लि**

या कंपनीनेही १ वर्षात गुंतवणूकदारांना चांगला परतावा दिला आहे. वर्षभरापूर्वी या कंपनीच्या शेअरची किंमत सुमारे ४९५ रुपये होती, ती आता सुमारे १४२ टक्क्यांनी वाढून सुमारे ११९७ रुपये झाली आहे. जर तुम्ही वर्षभरापूर्वी यामध्ये १ लाख रुपयांची गुंतवणूक केली असती तर तुम्हाला १.४२ लाख रुपयांचा फायदा झाला असता.

**३. गोदरेज प्रॉपर्टीज लि.**

रिअल इस्टेटमध्येही गोदरेज प्रॉपर्टीजचे नाव चांगलेच प्रसिद्ध आहे. या कंपनीच्या शेअर्सनेही १ वर्षात गुंतवणूकदारांना दुप्पट परतावा दिला आहे. वर्षभरापूर्वी त्याच्या शेअरची किंमत सुमारे १३८४ रुपये होती. आता त्याची किंमत सुमारे १०६ टक्क्यांनी वाढून २८५८ रुपये झाली आहे. जर तुम्ही वर्षभरापूर्वी त्यात १ लाख रुपये गुंतवले असते, तर ही रक्कम सुमारे २ लाख रुपये झाली असती, म्हणजेच तुम्हाला सुमारे १ लाख रुपयांचा थेट नफा मिळाला असता.

■ गुंतवणूक

४. प्रेस्टिज इस्टेट प्रोजेक्ट्स लि.

या कंपनीने एका वर्षात परताव्याच्या बाबतीत सर्वांना मागे टाकले आहे. या कंपनीने गेल्या एका वर्षात गुंतवणूकदारांना २०० टक्क्यांहून अधिक परतावा दिला आहे. जर तुम्ही वर्षभरापूर्वी यामध्ये १ लाख रुपये गुंतवले असते, तर तुम्हाला २ लाख रुपयांचा नफा झाला असता, म्हणजेच तुमची एकूण रक्कम ३ लाख रुपये झाली असती.

### कशात गुंतवणूक करावी ?

**मालमत्ता आणि समभागांमध्ये गुंतवणूक करण्याचे स्वतःचे फायदे आणि तोटे आहेत. काही गुंतवणूक तज्ज्ञांच्या मते, शेअर्समध्ये गुंतवणूक करणे धोक्याचे आहे. आज दिसणारा नफा उद्या असेल की नाही हे सांगणे कठीण आहे. त्याच वेळी, मालमत्तेच्या किमती वाढण्याची गती मंद असली तरी ती नक्कीच वाढत आहे. त्याच वेळी, तुम्ही ती मालमत्ता भाड्याने देऊन कायमस्वरूपी उत्पन्न देखील मिळवू शकता. मालमत्तेच्या किमती वाढतच राहतील.**

◆◆◆

## का वधारला शेअर बाजार ?

■ शेअर बाजार

मे महिन्यातील पहिले दोन आठवडे भारतीय शेअर बाजारासाठी काळजीचे ठरले. विशेषतः १० मे रोजी संपलेल्या सप्ताहात भारतीय शेअर बाजारात जोरदार घसरण पाहायला मिळाली होती. त्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. सांख्यिकी शब्दांत सांगायचे झाल्यास निफ्टी-५० या राष्ट्रीय निर्देशांकासाठी २२ हजारांची पातळी बऱ्याच दिवसांपासून भक्कम आधार राहिली होती, पण त्याच्याही खाली हा निर्देशांक गेल्यामुळे चिंता अधिक वाढली होती. परंतु १८ मे रोजी संपलेल्या सप्ताहातील दमदार तेजीमुळे या चिंतेला अर्धविराम मिळाला आहे. याला अर्धविराम म्हणण्याचे कारण म्हणजे शेअर बाजारासाठीचा सर्वांत मोठा इव्हेंट सध्या सुरू असून त्याचा निकाल आता काही दिवसांवर आला आहे. तोपर्यंत बाजारात मोठ्या प्रमाणात चढउतार दिसण्याची शक्यता आहे.

गतसप्ताहामध्ये एनएसईकडून शनिवारी १८ मे रोजी विशेष सत्र घेण्यात आले. या सत्राच्या अखेरीस निफ्टीमध्ये ९८ अंकांची वृद्धी झाली असून बऱ्याच दिवसांनंतर २२५०२ या आश्वासक पातळीवर या निर्देशांकाने विसावा घेतला आहे; तर बँक निफ्टीची बंदपातळी ४८१९९ अशी आहे. निफ्टी ५० मध्ये गतसप्ताहात २ टक्क्यांची वृद्धी झाली आहे. शुक्रवारच्या सत्रात मिडकॅप निर्देशांकाने ४२,८७३.६० ही नवी उच्चांकी पातळी गाठली आहे. याची कारणे काय आहेत? एक म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या-दुसऱ्या टप्प्यात मतदानाची टक्केवारी कमी झाल्याचे दिसून आल्यामुळे निकालांबाबतची चिंता दिसू लागली होती. परंतु गतसप्ताहात मतदानात सुधारणा दिसून आल्यामुळे गुंतवणूकदारांचा उत्साह वाढला आहे. लोकसभा निवडणुकांनंतर केंद्रात स्थिर सरकार स्थापन होईल असा विश्वास गुंतवणूकदारांना वाटत आहे.

बाजारातील तेजीला एक मोठा आधार लाभला तो महागाई दरात झालेल्या घसरणीचा. या घसरणीमुळे रिझर्व्ह बँकेच्या पुढील पतधोरण बैठकीमध्ये रेपोदरात कपात होण्याच्या शक्यता वाढल्या आहेत. व्याजदर घटल्यास बाजारासाठी तो मोठा बूस्टर असेल. कारण यामुळे बाजारातील तरलता वाढण्यास मदत होणार आहे.

तिसरी गोष्ट म्हणजे विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून होणाऱ्या विक्रीचा मारा कमी होत चाललेला असला तरी दुसऱ्या बाजूला डीआयआयकडून विशेषतः म्युच्युअल फंडस्कडून आणि किरकोळ गुंतवणूकदारांकडून होणाऱ्या खरेदीमुळे बाजाराला भक्कम आधार लाभला आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण खरेदीमुळेच बाजारातील पडझड थांबू शकली आहे. याखेरीज आर्थिक विकासाबाबतचे सकारात्मक अनुमान नित्यनव्याने समोर येत असल्याने दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवून गुंतवणूक करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. याखेरीज कृषीप्रधान देश असणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असणाऱ्या मान्सूनची वाटचाल सकारात्मक होत असल्याचे दिसून आले आहे. मान्सूनचा वर्षाव चांगला झाल्यास ग्रामीण भागातील मागणी वाढते आणि विविध क्षेत्रातील विविध कंपन्यांच्या उत्पन्नात आणि नफ्यामध्ये वृद्धी होते. त्यामुळे याचाही सकारात्मक प्रभाव बाजारात दिसून येत आहे.

| | |
|---|---|
| ■ सेन्सेक्स | ७४,००५.९४ (+३४२.२२) |
| ■ निफ्टी | २२,५०२.०० (+९८.१५) |
| ■ बँक निफ्टी | ४८,१९९.५० (+२२२.४५) |
| ■ फिन निफ्टी | २१,५०२.१५ (+८६.०५) |

गतसप्ताहातील शेवटच्या सत्राचे बंदपातळी भाव



या पार्श्वभूमीवर चालू आठवड्याचा विचार केल्यास सोमवारी मुंबईतील लोकसभेच्या मतदानामुळे शेअर बाजाराचे कामकाज बंद राहणार आहे. टेक्निकल चार्ट पाहिल्यास २२५०० च्या पातळीवर अद्यापही मोठ्या प्रमाणावर कॉल रायटिंग झालेले आहे. त्यामुळे मंगळवारी बाजाराची सुरुवात तेजी दर्शवत झाली तरी या पातळीकडे लक्ष ठेवून राहणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत बाजारासाठी २२३०० ही भक्कम आधार पातळी आहे. २२६०० च्या वर काही काळ राहिल्यास निफ्टी २२८०० ते २२९०० पर्यंत झेपावू शकतो. अमेरिकन बाजारात तेजीचे वारे वेगाने वाहात असल्यामुळे भारतीय बाजारासाठी जागतिक बाजारातूनही नकारात्मक संकेत येण्याच्या शक्यता नाहीयेत. त्यामुळे चालू आठवड्यामध्ये नफावसुलीमुळे घसरण झाल्यास 'बाय ऑन डिप्स' ही रणनीती वापरणे फायदेशीर ठरेल.

समभागांचा विचार करता जीके सीमेंटचा समभाग ३९०० रुपयांना खरेदी करुन ५००० रुपयांचे लक्ष्य ठेवता येईल. अशोक लेलँडचा समभाग २१० रुपयांना खरेदी करुन २३० रुपये लक्ष्य ठेवता येईल. मदरसन सुमीचा समभाग ६५ रुपयांसमीप खरेदी करुन ८० रुपये लक्ष्य ठेवता येईल. एलआयसी हौसिंगचा समभाग ६४० रुपयांना खरेदी करुन ७९० रुपये लक्ष्य ठेवता येईल. चीनमधून आयात होणाऱ्या वस्तूंवर अमेरिकेने आयात शुल्कात भरभक्कम वाढ केली आहे. याचा फायदा भारतासारख्या देशाला नक्कीच होऊ शकतो. त्यादृष्टीने धातू कंपन्यांसह अन्य काही समभागांची खरेदी लाभदायक ठरेल. नालकोचा समभाग १९८ रुपयांना खरेदी करुन २२५ रुपये लक्ष्य ठेवता येईल.

सर्वोच्च न्यायालयाने टेलिकॉम कंपन्यांकडे थकित असलेल्या इन्कम टॅक्सवरील व्याज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा फायदा या क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागात होणाऱ्या वाढीतून दिसू शकतो. याखेरीज आयओसी, गेल, सेल या कंपन्यांच्या समभांची खरेदीही मध्यमकाळात चांगला परतावा देणारी ठरेल. टाटा कंझ्युमरचा समभाग १४०० रुपये लक्ष्य ठेवून खरेदी करता येईल.

चालू आठवड्यात गतसप्ताहाप्रमाणेच बाजारात तेजीचा ट्रेंड कायम दिसून येऊ शकतो. तथापि, लोकसभेचे निकाल जवळ येऊ लागल्यामुळे वाढलेली अस्थिरता लक्षात घेता छोट्या छोट्या पातळ्यांवर नफा बुक करून आपली जोखीम करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. याखेरीज स्टॉपलॉसशिवाय काम करणे टाळले पाहिजे.

◆◆◆

## आयकर विभागाची नवी सुविधा

आयकर विभाग करदात्यांना मदत करण्यासाठी नवनवीन फीचर्स आपल्या वेबसाईटवर सादर करत आहे. रिटर्न भरण्याच्या या नव्या सत्रात आयकर विभागाने एक नवीन फीचर आणले असून त्याद्वारे करदात्यांना एका क्लिकवर विभागाकडून प्राप्त झालेल्या नोटिसांचा मागोवा घेता येणार आहेत.

आयकर विभागाचे हे नवीन फीचर ई-प्रोसिडिंग विभागात समाविष्ट करण्यात आले आहे. या नवीन टॅबवर क्लिक करून, वापरकर्ते सर्व प्रलंबित कर कार्यवाही एकाच ठिकाणी ट्रॅक करण्यास सक्षम असतील. आयकर विभागाकडून करदात्याला प्राप्त झालेली सर्व पत्रे आणि नोटिसा या एकाच टॅबमध्ये उपलब्ध असतील. त्यांना शोधण्यासाठी सर्चचा पर्यायही देण्यात आला आहे.

आयकर विभागाने एफएक्यूमध्ये या नवीन फीचरबद्दल स्पष्टीकरण देखील दिले आहे. त्यानुसार, ई-फायलिंग पोर्टलवर उपलब्ध असलेला ई-प्रोसीडिंग टॅब हा आयकर विभागाने जारी केलेल्या सर्व सूचना, सूचना आणि पत्रांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रतिसाद देण्याचा एक सोपा मार्ग आहे.




या नवीन टॅबमध्ये काय आहे?

* कलम १३९(९) अंतर्गत सदोष सूचना

* कलम २४५ अंतर्गत माहिती - मागणीचे समायोजन

* कलम १४३(१)(अ) अंतर्गत प्रथमदर्शनी समायोजन

* कलम १५४ अंतर्गत सुओ-मोटो सुधारणा

* मूल्यांकन अधिकारी किंवा इतर कोणत्याही आयकर प्राधिकरणाने जारी केलेल्या नोटिसा

* स्पष्टीकरण शोधणारे संप्रेषण

हे नवीन फीचर वापरण्यासाठी, वापरकर्त्यांना ई-फायलिंग पोर्टलसाठी पॅन, आयडी आणि पासवर्ड आवश्यक असेल. काही प्रकरणांमध्ये, सक्रिय टीएएननंबर देखील आवश्यक असू शकतो.

या नव्या फीचरमुळे करदात्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. यामुळे त्यांचा वेळ तर वाचेलच पण त्यांना कराशी संबंधित माहितीचा मागोवा घेणे आणि उत्तर देणे सोपे होईल.

पोर्टलवर सुरू करण्यात आलेल्या या नव्या सुविधेमुळे करदात्यावरील अनुपालनाचा बोजा कमी होईल, असे आयकर विभागाचे म्हणणे आहे. तसेच त्यांना प्रत्येक कामासाठी आयकर कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही. याशिवाय करदात्यांना आयकर सूचनांसह विभागाकडून पाठवलेल्या इतर विविध संदेशांवर लक्ष ठेवणे सोयीचे होईल.

◆◆◆

## पॅनकार्ड निष्क्रिय झाल्यास रिटर्न कसे भरावे?

जेव्हा एखादा करदाता आयकर रिटर्न भरण्यासाठी जातो तेव्हा यासाठी देखील पॅन कार्ड आवश्यक असते.




आता, जर तुम्ही तुमचा पॅन डेडलाइनपर्यंत आधारशी लिंक केला नसेल आणि पॅन निष्क्रिय झाले असेल तर आयटीआर कसा भरायचा हा प्रश्न नक्कीच तुम्हाला पडला असेल. पॅनकार्डशिवाय रिटर्न भरताना अडचणी येतात, पण ते भरणे शक्य आहे.

आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी ऑडिटची आवश्यकता नसणाऱ्या करदात्यांसासाठी दंडाशिवाय आयटीआर दाखल करण्याची मुदत ३१ जुलै २०२४ पर्यंत आहे.

अशा वेळी पॅनकार्ड निष्क्रिय झालेले करदाते आयटीआर फाइल करण्यासाठी आधार ओटीपीची मदत घेऊ शकतात. आधार ओटीपी पडताळणीच्या मदतीने बंद पॅनच्या बाबतीत आयटीआर दाखल केला जाऊ शकतो. त्यानंतर, रिटर्नची पडताळणी करण्यासाठी, करदात्यांना नेट बँकिंग, एटीएम इत्यादी पर्यायी पद्धतींद्वारे इलेक्ट्रॉनिक सत्यापन कोड तयार करावा लागेल.

याद्वारे आयटीआर भरता येणे शक्य होणार असले तरी रिफंड मिळवण्यात अडचणी येऊ शकतात. कारण आयकर विभागाने स्पष्टपणे सांगितले होते की, ज्यांचे पॅन आधारशी लिंक नाही अशा करदात्यांच्या आयकर परतावा दिला जाणार नाही. पॅनला आधारशी लिंक करण्याची अंतिम मुदत ३० जून २०२३ पर्यंत होती. तथापि, काही शुल्क भरून पॅन अद्याप आधारशी लिंक केले जाऊ शकते.

◆◆◆

## एटीएममधून खराब नोट आल्यास....




■ जाणून घ्या

एटीएममधून फाटलेल्या किंवा बनावट नोटा आल्यास घाबरण्याची गरज नाही. काही प्रक्रियेचा अवलंब करून तुम्ही नोटा बदलून मिळवू शकता.

जाणून घ्या कोणती बँक किती पैसे घेते? ह्ढ सर्व बँका आरबीआयच्या नियमांव्यतिरिक्त पैसे व्यवहार शुल्क आकारतात. दर महिन्याला ५ मोफत व्यवहारांनंतर, पंजाब नॅशनल बँक २१ रुपयांव्यतिरिक्त ९ रुपये कर आकारते. ५ मोफत व्यवहारांनंतर, एसबीआय एटीएममधून पैसे काढण्यासाठी १० रुपये आणि इतर एटीएममधून २० रुपये आकारले जातात. वृक्रऊ आणि खउखउख मेट्रो शहरात ३ आणि इतरत्र ५ व्यवहारांनंतर २१ रुपयांव्यतिरिक्त ८.५ रुपये आकारतात.

**नोटा बदलण्याची प्रक्रिया काय आहे ?**

एटीएममधून पैसे काढल्यानंतर फाटलेल्या नोटा आढळल्यास, ज्या बँकेशी एटीएम लिंक आहे त्या बँकेत जाऊन तुम्ही त्या बदलून घेऊ शकता. यासाठी तुम्हाला फक्त अर्ज लिहायचा आहे. या ॲप्लिकेशनमध्ये तुम्हाला पैसे काढण्याची तारीख, वेळ आणि ज्या एटीएममधून पैसे काढले त्याचा तपशील द्यावा लागेल. तपशिलांची पडताळणी झाल्यानंतर बँक लगेच नोट बदलून देईल.

**बनावट नोट आढळल्यास काय करावे ?**

एटीएममधून खोट्या नोटा बाहेर काढल्या गेल्यास, त्या बाजारात चालवण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, नोटा काढल्या त्याच वेळी एटीएममधील सीसीटीव्ही कॅमेरेंत त्या उलट सुलट करुन दाखवा. बनावट नोटा आणि पावत्या बँकेत घेऊन जा. तपासानंतर बँक नोट बदलून देईल. जर जास्तीची रोकड काढली गेली तर आरबीआय इश्यू ऑफिसमधून नोटा बदलल्या जातील.

**आरबीआयचे नियम काय सांगतात ?**

आरबीआयच्या नियमांनुसार कोणत्याही बँकेच्या शाखेतून किंवा रिझर्व्ह बँकेच्या कार्यालयातून नोटा सहज बदलता येतात. एकावेळी ५ हजार रुपयांच्या फक्त २० नोटा बदलू शकता. तथापि, मोठ्या प्रमाणावर फाटलेल्या किंवा जळलेल्या नोटा बँक बदलत नाही. अशा नोटा फक्त आरबीआयच्या इश्यू ऑफिसमध्ये जमा केल्या जाऊ शकतात.

**आरबीआयचे नियम जाणून घ्या ह्ढ**

एसबीआयच्या एटीएममध्ये नोट शॉर्टनिंग मशीनद्वारे तपासल्यानंतर नोटा टाकल्या जातात. अशा परिस्थितीत नोटा खराब होण्याची शक्यता कमी आहे. असे असतानाही जर नोटा खराब असतील तर बँकेच्या शाखेतून नोटा बदलून घेता येतील. आरबीआयच्या नियमांनुसार, जर कोणी नोटा बदलून देण्यास नकार दिला तर १०,००० रुपये दंड आकारला जाईल.

◆◆◆

## गृहकर्ज फेडणार आहात?

अमेरिकेतील महागाईचा दर खाली येत नसल्याने फेडरल रिझर्व्हकडून व्याजदरकपातीसाठी 'तारीख पे तारीख' दिली जात आहे. काही दिवसांपूर्वी तर फेडच्या एका सदस्यांनी व्याजदर वाढूही शकतात अशा प्रकारचे विधान करुन खळबळ उडवून दिली. परिणामी, इकडे आपल्याकडेही आरबीआय रेपोदर कपातीचा निर्णय लांबणीवर टाकताना दिसत आहे. याचाच अर्थ आणखी दोन-तीन महिने तरी कर्जाचा हप्ता कमी होणार नाहीये. अशावेळी काही मंडळी गुंतवणूक कमी करत ते पैसे गृहकर्जात भरून त्याचा भार कमी करण्याचा विचार करत आहेत.



गृहकर्जावरील व्याजदर जादा राहण्याची शक्यता आहे. यामागचे कारण म्हणजे आरबीआयकडून व्याजदर कपात होण्याची तूर्त शक्यता नाही. म्हणून गृहकर्ज घेतलेल्या लोकांचा कर्जाचा हप्ता काही काळ अधिक राहू शकतो. सध्या गृहकर्जाचा हप्ता भरण्याबरोबरच म्युच्युअल फंड एसआयपी भरणारेही अनेक जण असतात. सध्या शेअर बाजार उच्चांकी पातळीवर आहे. अशावेळी अनेक जण गुंतवणूक रक्कम कमी करून गृहकर्जाचा हप्ता वाढविण्याचा विचार करत आहेत. तो योग्य की अयोग्य हे स्थितीवर अवलंबून राहू शकते. अर्थात गृहकर्ज वेळेच्या आत फेडले तर बरीच रक्कम वाचवता येणे शक्य आहे. तरीही वेळेच्या अगोदर कर्जफेडीच्या मुद्यावर अधिक भर देण्याची फारशी वाटत नाही.

**घाईगडबडीत प्री पेमेंट करणे योग्य नाही**

प्री पेमेंटबाबत वेगवेगळे मत असू शकते. गृहकर्ज लवकर संपवणे आणि आपल्या जीवनातील अन्य फायनान्शियल गरजा यात ताळमेळ असणे गरजेचे आहे. मग आपण काय करायला हवे. उदा. आपल्या गृहकर्जाचा व्याजदर ८.७५ टक्के असेल तर होम लोनचा आकार आणि सेक्शन २४ बी नुसार मिळणाऱ्या करसवलतीनंतर होम लोनचा इफेक्टिव्ह इंटरेस्ट कमी होतो आणि तो ८ टक्के राहतो.

**प्री पेमेंटने कर्जाचे ओझे कमी**

आपण वेळेच्या अगोदर गृहकर्ज फेडत असाल तर आपल्याला राहिलेल्या रक्कमेवर ८.७५ टक्के व्याज भरण्याची गरज भासणार नाही. आता त्याची तुलना आपण गुंतवणुकीशी करू. गेल्या दोन वर्षात शेअरमधील गुंतवणूक ही चांगली राहिली आहे. आपल्या इक्विटी पोर्टफोलिओचा 'एक्सआयआरआर' हा आपल्या होम लोनच्या व्याजदरापेक्षा अधिक असेल.

**शेअर बाजारातील घसरणीने परतावा कमी**

थोडा वेगळा विचार केला तर बाजारात काही काळ सुस्ती येऊ शकते. अशावेळी शेअर बाजारावर मिळणारा परतावा हा कमी होऊ शकतो.म्हणून आपण गुंतवणुकीतील रक्कम कमी करत ती गृहकर्जात पैसे भरण्याची तयारी करू शकता. या रणनितीने होणारी बचत आणि शेअर बाजारातील गुंतवणुकीवर मिळणारा परतावा यातील फरक समजून घ्यावा लागेल.

**दीर्घकाळासाठी इक्विटीतील परतावा चांगला**

दीर्घकाळात इक्विटी बाजारातून दहा ते बारा टक्के सरासरीने परतावा मिळू शकतो. अर्थात ही बाब गृहकर्जाच्या व्याजदरापेक्षा नेहमीच अधिक राहिली आहे. गुंतवणुकीवर परतावा मिळण्याची शक्यता असते, परंतु हमी नसते. शेअर बाजारात आपल्याला दीर्घकाळासाठी दहा ते बारा टक्के परतावा मिळू शकतो, परंतु त्याची हमी देता येणार नाही.

**गुंतवणूक थांबविण्याचा निर्णय**

आपण प्री पेमेंट करत नसाल आणि गुंतवणूक सुरू ठेवता असाल तर तो एक चांगला निर्णय राहू शकतो. परंतु बाजार कोसळत असेल आणि आपण प्री पेमेंट करत नसाल तर तो निर्णय योग्य ठरणार नाही. म्युच्युअल फंडसवर मिळणाऱ्या परताव्याची हमी नाही. मात्र इतिहास पाहिला तर दीर्घकाळासाठी म्युच्युअल फंडवरील परतावा हा गृहकर्जाच्या व्याजदराच्या तुलनेत अधिक राहिला आहे. त्यामुळे आक्रमक रुपाने कर्जात पैसे भरण्याऐवजी गुंतवणूक सुरू ठेवणे हा चांगला निर्णय राहिल.

### अधिक वय असेल तर प्री पेमेंट करणे योग्य

**आपल्या वयाच्या हिशोबाने गृहकर्जाकडे पाहिले पाहिजे. जर आपले वय कमी असेल तर आपल्याकडे बराच वेळ आहे. अशा स्थितीत गुंतवणुकीच्या तुलनेत कर्जफेड करण्याच्या पर्यायाला फारसे महत्त्व दिले जात नाही. मात्र आपण निवृत्तीच्या जवळ आला असाल आणि बरेच कर्ज शिल्लक राहिले असेल तर अशावेळी कर्ज लवकर फेडण्याचा निर्णय हा चांगला राहू शकतो.**

# कोरोना महामारीत लूट झालेल्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी २ जूनला नगर शहरात बैठक

### आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी लोकभज्ञाक चळवळीचा पुढाकार



नगर – कोरोना महामारीत हॉस्पिटलमध्ये लूट झालेल्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची बैठक २ जून रोजी शहरातील हुतात्मा स्मारकात लोकभज्ञाक चळवळीच्या वतीने बोलविण्यात आली आहे. लूट झालेल्यांचे पैसे त्यांना परत मिळण्यासाठी व आजही काही रुग्णांकडे पैश्यासाठी तगादा लावणाऱ्यांना धडा शिकविण्यासाठी या बैठकीत आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली.

कोरोना महामारीने जगभर हैदोस घातला असताना भारतात योग–भज्ञाक तंत्रामुळे अमेरिका, इंग्लंड यांच्यापेक्षा मृत्यांची संख्या फारच कमी होती. कोरोना विरोधात लसीचा वापर झाला. परंतु त्यामुळे त्यांचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात चर्चेत आहेत. यापुढे सुद्धा योग–भज्ञाक तंत्रामुळे भारतासह जगभरातील मानव जातीला नक्कीच हमी उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

योग–भज्ञाक ही तत्व प्रणाली हजारो वर्षे सिद्ध झाली आहे आणि निसर्गाने दिलेले वरदान या स्वरूपात तमाम लोकांनी त्याचा वापर केला पाहिजे. योगा बाबतची भक्ती, योगाचे ज्ञान आणि प्रत्यक्ष योग विद्येचा वापर यातून प्रतिकारशक्ती प्रचंड वाढते. ही बाब भारतीयांना गेली ५ हजार वर्षापासून माहिती आहे. योगाला आयुर्वेदाने साथ दिल्यामुळे कोरोना आटोक्यात येऊ शकला, त्यामुळे भारतासह सर्वच मानव जातीने योग–भज्ञाक तंत्राचा स्वीकार आणि वापर सातत्याने केला पाहिजे असे, आवाहन करण्यात आले आहे.

२ जून रोजी दुपारी ३ वाजता हुतात्मा स्मारकात बैठक होणार असून, या बैठकीस कोरोना काळात लूट झालेल्या नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या बैठकीसाठी अ‍ॅड. गवळी, शाहीर कान्हू सुंबे, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, डॉ. रमाकांत मडकर, जालिंदर बोरुडे, ओम कदम आदी प्रयत्नशील आहेत.

# छत्रपती संभाजी महाराज गौरव पुरस्कार नगर येथील लक्ष्मण घोलप यांना जाहीर



नगर – निस्वार्थ भावनेने केलेल्या सामाजिक कार्याबद्दल लक्ष्मण मारुती घोलप यांना स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त राज्यस्तरीय पाचव्या काव्य संमेलनचे आयोजन करण्यात आले आहे. या काव्य संमेलनात पाहुण्यांच्या हस्ते श्री. घोलप यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती काव्य संमेलनाचे आयोजक तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे व सचिव मंदाताई डोंगरे यांनी दिली.

पिंपळवाडी (ता. जामखेड) येथील लक्ष्मण घोलप मागील ३५ ते ४० वर्षापासून सामाजिक कार्यात योगदान देत आहे. शेतकरी, काम गारांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला. तर ग्रामीण भागात विविध सामाजिक उपक्रम राबवून ग्रामस्थांना आधार देण्याचे काम केले. तर जिल्हा परिषद शाळेला विविध साहित्याची मदत देऊन, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने उपक्रम राबविले. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना छत्रपती संभाजी महाराज गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.



अहमदनगर जिल्हा रीले स्केटिंग संघटनेचे यशस्वी खेळाडू. समवेत झिषान शेख, सचिन गायकवाड, अक्षय चोपडे, सौ. सविता पाटोळे आदी.

# अहमदनगर जिल्हा रीले स्केटिंग संघटनेचे यश

नगर – महाराष्ट्र राज्य रिले स्केटिंग संघटनेच्या वतीने व छत्रपती संभाजीनगर जिल्हा रिले स्केटिंग संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १९ मे रोजी राज्यस्तर स्पीड व रिले स्केटिंग स्पर्धांचे आयोजन विभागीय क्रीडा संकुल येथे पार पडल्या.

या स्पर्धा मध्ये अहमदनगर जिल्हा रिले स्केटिंग संघटनेच्या खेळाडूने अत्यंत चुरशीची लढत देत पदकांची लयलूट केली.

निकाल खालील प्रमाणे १. वैभव प्रदीप पाटोळे १० वर्ष क्वॉड्स – १ सुवर्ण, १ रजत,१ कांस्य., २. तन्मय गोटे १ सुवर्ण, १ कांस्य. ३. रोहित आव्हाड २ कांस्य., ४. वरद पेद्राम १ सोने, २ चांदी., ५. अर्सलान शेख १ रौप्य, १ कांस्य., ६. जैनब १ सुवर्ण, १ कांस्य., ७. अक्रम १ सुवर्ण, १ कांस्य., ८. हमजा शेख (सर्वोत्कृष्ट स्केटर) २ कांस्य.

सर्व खेळाडूंचे या यशाबद्दल संघटनेचे अध्यक्ष झिषान शेख, टेनिस बॉल क्रिकेट संघटना संस्थापक सचिव सचिन गायकवाड, अक्षय चोपडे, टीम टॉपर्स स्केटिंग अकॅडमीच्या अध्यक्षा सौ. सविता पाटोळे, एन एस पी फाउंडेशनचे सर्वेसर्वा सौ. नलिनी सुंदर पाटोळे यांनी शुभेच्छा देत कौतुक केले. गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धासाठी प्रोत्साहन व पाठबळ दिले. वरील सर्व खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक प्रदीप पाटोळे व सागर भिंगरदिवे यांचे मार्गदर्शन लाभले.

# निवडणुकीच्या वादातून बोल्हेगावात दोन गटात हाणामारी

### परस्परविरोधी फिर्यादीवरून १५ जणांविरूध्द गुन्हे दाखल

नगर – बोल्हेगाव उपनगरातील गांधीनगरमध्ये शनिवारी रात्री दोन गटात चांगलाच राडा झाला. कोयता, दांडक्याने हाणामारीची घटना घडली. लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राजवळील भाजपाच्या बुथजवळ थांबल्याच्या कारणातून हा प्रकार घडला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात परस्परविरोधी फिर्यादीवरून १५ जणांविरूध्द रविवारी पहाटे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

जखमी आदेश किसन भिंगारदिवे (वय २०, रा. भिंगारदिवे मळा, गांधीनगर, बोल्हेगाव) यांनी रूग्णालयात उपचार घेत असताना दिलेल्या जबाबावरून अशिष विठ्ठल शिरसाठ, चेतन संतोष सरोदे, योगेश संतोष सरोदे, शारून दाउद जाधव, यश रावसाहेब शिरसाठ (सर्व रा. गांधीनगर, बोल्हेगाव) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदेश यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, शनिवारी (दि.१८) रात्री १०.२४ वाजता मित्र अमिर अकीश शेख यांनी फोन करून मित्र पंकज मच्छिंद्र दराडे यांना जय भवानी चौक येथे मारहाण झाली आहे, असे सांगितले.

मी व मित्र अभिषेक लांडगे यांच्यासह दुचाकीवरून जात असताना असे समजले की पंकजला मारहाण करणारे गावडे किराणा दुकान, सरोदे यांच्या दारूच्या धंद्यावर गेले आहेत. मी व मित्र अभिषेक आणि भवानी चौकात असलेले जमिर पठाण, कार्तिक भालसिंग, परमेश्वर मगर, ओंकार आपरे, रोहित जाधव असे सर्व दुचाकीवरून गावडे यांच्या किराणा दुकानाकडे गेलो. पंकजला मारहाण केल्याचा जाब विचारला असता जवळच्या दारूच्या दुकानातून कोयता, दांडके घेऊन येत पाच जणांनी मारहाण केली. दुचाकींची तोडफोड केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

जखमी चेतन संतोष सरोदे (वय १८ रा. भिम चौक, गांधीनगर, बोल्हेगाव) यांनी रूग्णालयात उपचार घेत असताना दिलेल्या जबाबावरून आदेश किसन भिंगारदिवे, संकेत किसन भिंगारदिवे, जमीर पठाण, सोन्या कांडगे, रोहित जाधव, पंकज दराडे (सर्व रा. गांधीनगर, बोल्हेगाव) व इतर चार ते पाच अनोळखी यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. चेतन यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, लोकसभा निवडणुकीत मतदानाच्या दिवशी मी कमळाच्या चिठ्ठ्या देणार्या टेबलावर बसलो असता आदेश भिंगारदिवे, संकेत भिंगारदिवे, जमीर पठाण व त्यांच्या सोबतची आणखी मुले माझ्याकडे खुन्नसने पाहत होते. शनिवारी (दि.१८) रात्री हिरा पॅलेस येथून मित्र अशिष शिरसाठ याच्यासोबत घरी जात असताना भिम चौकात थांबलो. तेथे चार दुचाकीवरून आदेश, संकेत, जमीर, सोन्या, रोहित, पंकज व अनोळखी चार ते पाच जण आले त्यांनी माझ्यावर कोयता, दांडक्याने हल्ला करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. मित्र अशिष मध्ये पडला असता त्यांना देखील मारहाण केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### स्थानिक गुन्हे शाखेने ८ जणांना पकडले

घटना घडल्यानंतर पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने रात्रीतून धरपकड करून एका अल्पवयीन मुलासह आठ जणांना ताब्यात घेतले. अभिषेक ऊर्फ सोन्या राजेंद्र लांगडे, संकेत किसन भिंगारदिवे, जमीर शौकत पठाण, ओमकार सतिष आपरे, परमेश्वर हरिभाऊ मगर, थॉमस ऊर्फ योगेश संतोष सरोदे, यश रावसाहेब शिरसाठ व एक अल्पवयीन मुलगा यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

# अंबिका पतसंस्थेच्या संचालकांच्या जप्त मालमत्तेचा लिलाव करावा

### ठेवीदारांचे पैसे देण्याचा न्यायालयाचा निकाल

नगर – केडगांव येथील अंबिका ग्रामीण पतसंस्थेच्या संचालकांच्या जप्त केलेल्या मालमत्तेचा लिलाव करुन ठेवीदारांचे पैसे त्वरीत द्यावे असा महत्त्वपूर्ण निकाल जिल्हा न्यायाधिश पी. आर. शित्रे यांच्या कोर्टाने १८ मे रोजी दिला. या निकालाचे सर्व ठेवीदारांनी जोरदार स्वागत केले.

अनेक गोरगरीब ठेवीदारांचे पैसे अडकल्यामुळे दैनंदिन जीवनामध्ये ठेवीदारांना अनेक आर्थिक अडचणींना तोंड दयावे लागत होते. आता उपविभागीय दंडाधिकारी, नगर यांच्यामार्फत शासन स्तरावर विलंब न लावता जप्त केलेल्या मालमत्तेची लिलाव प्रक्रिया त्वरीत सुरु करावी अशी सर्व ठेवीदारांनी मागणी केली आहे.

ठेवीदारांचे वतीने अ‍ॅड. श्रीमती यु. जे. थोरात (अतिरिक्त सरकारी अभियोक्ता) यांनी ठेवीदारांची भक्कम बाजू मांडली. मुळ ठेवीदाराच्यावतीने अ‍ॅड. राजेंद्र शेलोत, अ‍ॅड. हर्षद शेलोत व सौ. शेलोत यांनी काम पाहिले.

# नगरमध्ये पोलीस उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला टार्गेट करत आहे



भगवान फुलसौंदर

नगर – शिवसेना खा. संजय राऊत व युवा सेनेचे राज्य सचिव विक्रम राठोड यांच्यावर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहे. हे शिवसैनिकांना पटले नाही नगरमध्ये पोलीस फक्त उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेला टार्गेट करत आहे असे त्यांना वाटू लागले आहे.

याबद्दल दाखल केलेल्या गुन्ह्याप्रकरणी प्रथम महापौर भगवान फुलसौंदर म्हणाले लोकसभेची नगरची निवडणूक पार पडली. यामध्ये सभेचा धुराळा उडाला होता, खा. संजय राऊत हे महायुतीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ नगरला आले होते, इतर नेते होते, शिवसेनेचा टायगर असलेले श्री.राऊत यांनी भाषण केले, लोकशाहीम ध्ये भाषण स्वतंत्र आहे, परंतु त्यांच्यावर कोतवालीमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे लोकशाहीला धरून नाही. कारण घटना घडल्यानंतर व निवडणूक संपल्यानंतर हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

विरोधी पक्षांवर बोलणे हे प्रत्येक कार्यकर्त्याचे कर्तव्य असते त्यांनी लोकांसमोर लोकसभेच्या भानगडी आणल्या म्हणून गुन्हा दाखल झाला, परंतु ज्या लोकांना जेलमध्ये टाकायचे तेच आज मंत्रीपद भोगत आहेत. पण नगरमध्ये मात्र चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल होत आहेत. पोलिसांनी नगर शहरातील चोऱ्या, गुंडागर्दी, भर दिवसा हाणामाऱ्या यावर कारवाईची करायचे सोडून जखम मांडीला व इलाज शेंडीला या म्हणीप्रमाणे पोलिसांचे काम सध्या नगर शहरामध्ये चालू आहे

दुसरे प्रकरण असे की मतदानाच्या दिवशी विक्रम राठोड यांनी शाही लावणारा मनुष्य पकडला व पोलिसांच्या ताब्यात दिला, तर त्याच्यावरच खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या नगर शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेची लोकप्रियता आहे, काही विरोधी पक्षाच्या लोकांना ती सहन होत नाही, म्हणून शिवसेनेला टारगेट केले जात आहेत असा आरोप त्यांनी केला व असे उद्योग आम्ही शिवसैनिक खपवून घेणार नाही व गुन्हे मागे घ्यावेत असे आवाहन त्यांनी शिवसैनिकांच्या वतीने केले आहे

# स्मृती क्लिनिकतर्फे नगरमध्ये २१ मे रोजी मोफत त्वचारोग निदान शिबिराचे आयोजन

नगर – स्मृती प्रतिष्ठान संचलित स्मृती स्किन, हेअर, लेझर, होमिओपथिक क्लिनिक राणी लक्ष्मीबाई चौक भूषणनगर, केडगाव येथे मोफत त्वचारोग निदान शिबीर २९ मे रोजी आयोजित करण्यात आले आहे.

सर्व गरजू मे रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात आले आहे. शिबिरामध्ये आलेल्या रुग्णांना त्वचेवरील सर्व उपचारांवर सवलत देण्यात येईल. शिबीर सकाळी १० ते १ व संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत असेल.

शिबिरामध्ये त्वचारोग निदान उपचार, केसांच्या समस्या व उपचार, सौंदर्य समस्या, केमिकल पिलिंग, लेझर पिलिंग, कार्बन पिलिंग (लेझरद्वारे), PRP उपचार (त्वचा व केसांच्या तक्रारीसाठी), तीळ, गोंदण काढणे, वेदनेरहित मस, चामखीळ काढणे, परमनंट हेअर रिडक्शन करणे, स्ट्रेच मार्क कमी करणे, केसांतील कोंडा कमी करणे, मेडीफेशियल उपचार इ. सर्व उपचार हे अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने अत्यल्प दरात करण्यात येणार आहे असे क्लिनिकचे संचालक डॉ. सौ. शुभांगी दीपक शिंदे यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी ९११२९९२९२५ किंवा ७५१७२९५७५१ वर संपर्क साधणे.

# शिक्षिकेच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसका मारून पळविली

### सोलापूर रस्त्यावरील कोंबडीवाला मळ्यातील घटना; दोघांवर गुन्हा दाखल

नगर – दुचाकीच्या डिक्कीतून घराची चावी काढत असताना दुचाकीवरून आलेल्या दोघांनी शिक्षिकेच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोन्याची चेन बळजबरीने ओढून तोडून नेली. सोलापूर रस्त्यावरील कोंबडीवाला मळ्यात इंदिरा हाऊसिंग सोसायटीसमोर ही घटना घडली. शिक्षिका निता लोकेश बर्वे (वय ४०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी निता या १६ मे रोजी रात्री सव्वा आठ ते साडेआठच्या दरम्यान इंदिरा हाऊसिंग सोसायटीसमोर त्यांच्या दुचाकीच्या डिक्कीतून घराची चावी काढत असताना समोरून विरूध्द दिशेने दोन चोरटे दुचाकीवरून त्यांच्याजवळ आले. त्यांनी क्षणार्धात निता यांच्या गळ्यातील ३० हजार रूपये किमतीची दीड तोळ्याची सोन्याची चेन हिसकावली. निता यांनी प्रतिकार केला असता त्या दोघांनी जबरदस्तीने चेन तोडून चोरून नेली. त्यांनी आरडाओरडा केला असता परिसरातील लोक जमा झाले. त्यांनी कॅम्प पोलिसांना माहिती दिली. पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, सहायक निरीक्षक योगेश राजगुरू यांनी घटनास्थळी भेट दिली. दरम्यान कॅम्प पोलीस ठाण्याची सीसीटीएनएस प्रणाली बंद असल्याने शनिवारी (दि.१८) रात्री उशिरा याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस उपनिरीक्षक निसार शेख अधिक तपास करत आहेत.

# भिंगार शहरामध्ये सुगंधी तंबाखूच्या माव्याची विक्री करणाऱ्यांवर कारवाई

नगर – राहत्या घरातच सुगंधी तंबाखू व सुपारीचा वापर करून मशिनच्या सहाय्याने मावा तयार केल्याचा प्रकार भिंगारमध्ये समोर आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. याप्रकरणी दोघा भावांविरूध्द भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्यांच्याकडून सुगंधी तंबाखू, सुपारी चूरा, तयार मावा, मशीन असा ५३ हजार १९० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अंमलदार जालिंदर माने यांच्या फिर्यादीवरून रूपेश मच्छिंद्र अळकुटे (वय २९) व रवींद्र मच्छिंद्र अळकुटे (वय ३१, दोघे रा. वडारवाडी, भिंगार) यांच्याविरूध्द भादंवि कलम ३२८, १८८, २७२, २७३ कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दुसरी कारवाई आलमगीर चौकातील जुडवा पान स्टॉलवर रविवारी (दि.१९) दुपारी केली.

या ठिकाणी सुगंधी तंबाखूपासून तयार केलेला मावा व रोख रक्कम असा ९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून पो.हे.कॉ. अतुल लोटके यांच्या फिर्यादीवरून सोहेल अन्सार मोमीन (रा. आलमगीर, भिंगार) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पीओपी ऐवजी पर्यावरणपूरक गणेश मूर्ती तयार कराव्यात

### १३० कारखानदारांना मनपाच्या नोटीसा

नगर – प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्ती तयार न करता पर्यावरण पूरक मूर्ती तयार कराव्यात. तीन दिवसांच्या आत गणेश मूर्ती बनविण्यासाठी वापरले जाणाऱ्या पीओपी साहित्याची विल्हेवाट लावावी. असा साठा आढळून आल्यास प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिकेने गणेश मूर्ती बनवणाऱ्या कारखानदारांना दिला आहे.

पर्यावरण पूरक गणेश मूर्ती तयार करण्याबाबत व पीओपीच्या मूर्तींबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या पत्राच्या आधारे महापालिकेने शहरातील १३० कारखानदारांना नोटीसा बजावल्या आहेत. अहमदनगर जिल्हा गणेश मूर्तीकार संघटनेने याचा निषेध करत ही नोटीस अन्यायकारक असल्याचे म्हटले आहे.

पीओपी मूर्तींच्या उत्पादन व विक्रीवर कोणतीही बंदी नसल्याचे सरकारने विधान परिषदेत मागील वर्षी स्पष्ट केलेले आहे. तरीही चुकीचा अर्थ काढत या नोटीसा बजावण्यात आल्याचा दावा संघटनेने केला आहे. चुकीचा संदर्भ घेऊन शहरातील व जिल्ह्यातील कुटुंबांना बेरोजगार करू नये, असे मत संघटनेचे जिल्हाध्यक्ष भरत निंबाळकर यांनी म्हटले आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी महापालिका आयुक्तांनाही पाठविले आहे.

# कुष्ठधाम रोडवरील अवैध गॅस रिफिलिंग सेंटरवर छापा

### तिघांविरूध्द गुन्हा दाखल; नाशिकच्या पथकाची कारवाई

नगर – नाशिक येथील विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या पथकाने अनेक दिवसांनंतर नगर शहरात अवैध धंद्यावर कारवाई केली. सावेडीच्या कुष्ठधाम रस्त्यावरील सोनानगर चौक येथे अवैधरित्या सुरू असलेल्या गॅस रिफिलिंग सेंटरवर छापा टाकून गॅस भरण्याचे मशीन, रिक्षा, गॅस टाक्या असा १ लाख ५ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तिघांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अंमलदार शकील शेख यांनी फिर्याद दिली आहे. संकेत दत्ता शिंदे (वय २० रा. वैदूवाडी, सावेडी), तुषार गुलाब सोनवणे (वय ३०, रा. सम्राटनगर, वडगाव रस्ता, एमआयडीसी, नागापूर), महंतप्पा कल्लप्पा चांदकोटी (वय ६१, रा. फकीरवाडा, नगर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे पथक तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना पोलीस निरीक्षक दौलत जाधव यांना माहिती मिळाली की, संकेत शिंदे हा हस्तकांमार्फत अनधिकृतरित्या घरगुती गॅस सिलेंडरमधून गॅस रिक्षामध्ये रिफिलिंग करून देत आहे. निरीक्षक जाधव यांनी पथकातील अंमलदार व पंचासमक्ष सदर ठिकाणी शनिवारी छापा टाकला असता सोनानगर चौकात टपरीसमोर रिक्षामध्ये घरगुती गॅस सिलेंडरमधून तीन व्यक्ती प्रेशर पंपाच्या सहाय्याने रिक्षाच्या टाकीत गॅस भरत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत साहित्य जप्त केले आहे. दरम्यान संकेत शिंदे याच्याविरूध्द २३ मार्च रोजी तोफखाना पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली होती.

डायल ११२ नंबरवर यासंदर्भात तक्रार आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती. त्याने पुन्हा धंदा सुरू केला होता.

# लिपिक टंकलेखक संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीसाठी उमेदवारांची यादी जाहीर

मुंबई – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र गट–क सेवा मुख्य परीक्षा–२०२३, मधील लिपिक टंकलेखक, गट–क या संवर्गाच्या टंकलेखन कौशल्य चाचणीकरिता अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त व पदवीधर अंशकालीन आरक्षणाचा दावा करणाऱ्या व अर्हताप्राप्त यादीत समावेश झालेल्या उमेदवारांना टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाचा कालावधी व २ संधी अनुज्ञेय असल्यामुळे अशा उमेदवारांना टंकलेखन चाचणी अनिवार्य नाही. पूर्व परीक्षेसाठीच्या आवेदनपत्रात 'लिपिक टंकलेखक' संवर्गाचा विकल्प दिलेल्या व पूर्व परीक्षेतून अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांचाच शासनस्तरावर तपासणी करण्याच्या अधीन राहून या टंकलेखन कौशल्य चाचणीच्या निकालात समावेश करण्यात आला आहे.

टंकलेखन कौशल्य चाचणी अर्हताकारी/पात्रता स्वरुपाची असून त्याबाबत उमेदवारांना आयोगाच्या https://mpsc.gov.in संकेतस्थळावर प्रसिध्दीपत्रकाद्वारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

# मतदान करतानाचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल

### नगरजवळील दरेवाडी येथील प्रकार; एका जणावर गुन्हा दाखल

नगर – लोकसभा निवडणुकीत मतदान करतानाचा व्हिडीओ मोबाईलमध्ये काढून तो सोशल मीडियावर व्हायरल केल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरूध्द भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भा. दं. वि. कलम १८८, लोकप्रतिनिधी अधिनियम कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद शाळा दरेवाडी (ता. नगर) येथील मतदान केंद्रावर ही घटना घडली. केंद्राध्यक्ष रवींद्र किसन चोभे (वय ४६ रा. दळवी मळा, गुलमोहोर रस्ता, सावेडी) यांनी फिर्याद दिली आहे. ते इतर सहकाऱ्यांसह १३ मे रोजी लोकसभा निवडणुक मतदानाच्या दिवशी दरेवाडी येथील शाळेत केंद्राध्यक्ष म्हणून ड्यूटीवर असताना अज्ञात व्यक्तीने मतदान करतानाचा चोरून व्हिडीओ क्लिप काढून ती इंस्टाग्राम अकाऊंटवर व्हायरल केली आहे.

याबाबत गुन्हा दाखल करण्याचे आदेश सहा. निवडणूक निर्णय अधिकारी शाहुराज मोरे यांनी दिल्यानंतर चोभे यांनी शनिवारी (दि.१८) भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

